RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

सोमवार , ०८ जून २०२६
Monday, 08 June 2026
वर्ष : ६ | अंक : १५८
Year : 6 | Issue : 158
दैनिक
Daily
किंमत : ₹ ५/-
Rate: Rs. 5/-

**दि. 08 जून 2026**



१९२७ - कोलंबिया विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पी.एच.डी.झाल्याबध्दल ही पदवी दिली.
१९२८ - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली मिलिटरी पेन्शनरांची दामोदर हॉल, मुंबई येथे सभा. संकलन प्रा. यशवंत दुपटे

## राजेश एक्सपोर्ट्स सेबीच्या निगराणीखाली का आहे?

नवी दिल्ली : भारतातील सर्वात मोठी ज्वेलरी आणि सोन्याची रिफायनिंग करणारी कंपनी राजेश एक्सपोर्टसला सेबीने दणका दिला आहे. सेबीनं या कंपनीवर आर्थिक आकडेवारी चुकीच्या पद्धतीनं सादर केल्याचा आरोप केला आहे. सेबीच्या अंतरिम अहवालानुसार आर्थिक आकडेवारी चुकीच्या पद्धतीनं सादर करण्यात आली आहे. राजेश एक्सपोर्टसने गेल्या पाच आर्थिक वर्षात 15.15 लाख कोटींचा महसूल चुकीच्या पद्धतीनं सादर केला होता. 2020-21 ते 2024-25 या आर्थिक वर्षांदरम्यान कंपनीने सुमारे 15.15 लाख कोटी रुपयांचा महसूल वाढवून दाखवल्याचा आरोप आहे. या कंपनीची उपकंपनी च्या उत्पन्नाच्या जवळपास 99.8 टक्के आहे. मार्च 2024 मध्ये एका शेअरधारकानं व्यापारी देण्यांसदर्भात तक्रार केली होती. तक्रार मिळाल्यानंतर सेबीने विस्तृत चौकशी सुरु केली होती. त्यामध्ये राजेश एक्सपोर्टसच्या आर्थिक पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

सेबीने तपासणीदरम्यान स्वित्झरलँड येथील राजेश एक्सपोर्टसची सहायक कंपनी वाल्कैम्बी एसए संदर्भात चौकशी सुरु केली. कारण राजेश एक्सपोर्टसकडून ती कंपनी प्रमुख ऑपरेशन सेंटर म्हणून दाखवण्यात आली होती. कंपनीच्या रिपोर्टनुसार कन्सोलिडेटेड उत्पन्नापैकी 97 ते 99 टक्के भाग विदेशी सहायक कंपन्यांकडून मिळत होते. मात्र सेबीने वाल्कैम्बी एसएच्या स्वतंत्र लेखापरिक्षण खाती आणि राजेश एक्सपोर्टसच्या कन्सोलिडेटेड आकडेवारीत तफावत आढळून आली होती.

मिंटच्या रिपोर्टनुसार वाल्कैम्बी एसएचे प्रत्यक्ष उत्पन्न कंपनीने दाखवलेल्या उत्पन्नापेक्षा कमी होतं. यामुळे इतर उत्पन्न कोणत्या मार्गानं आला हा प्रश्न उपस्थित आला. याशिवाय सेबीने केलेल्या आरोपानुसार राजेश एक्सपोर्टसने विक्री, खरेदी, स्टॉक या संदर्भात इतर सविस्तर माहिती दिली उपलब्ध करुन दिली नाही.

राजेश एक्सपोर्टसने यासाठी स्विस डेटा सुरक्षा कायदा आणि गोपनीय करारांचा दाखला दिला होता. मात्र, सेबीने हा दावा फेटाळला होता.

भारतीय शेअर बाजारात लिस्ट असलेल्या कोणत्याही कंपनीला भारतीय कायद्यानुसार माहिती द्यावी लागेल, विदेशी गोपनीय कायद्यांची पळवाट चालणार नाही, असे सेबीने म्हटले होते. कंपनीने दाखल केलेल्या काही कागदपत्रांमध्ये विरोधाभास आढळून आला आहे. एकाच फायलिंगमध्ये ग्राहकांची विक्रीची आकडेवारी वेगवेगळी सांगण्यात आली. काही ग्राहक एका रिपोर्टमध्ये दाखवण्यात आले तर दुसऱ्या रिपोर्टमध्ये ते गायब होते. यामुळे कंपनीनं उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सेबीनं राजेश एक्सपोर्टसचे प्रमुख राजेश मेहता यांना चौकशीत पूर्ण सहकार्य करण्याचे आदेश दिले आहेत. राजेश मेहता यांना पुढील आदेशापर्यंत राजेश एक्सपोर्टसच्या शेअरमध्ये ट्रेडिंग करण्यास बंदी घालण्यात आली आहे. चौकशीत आरोप सिद्ध झाले तर भारताच्या कॉर्पोरेट इतिहासात लेखापरिक्षण वादातील सर्वात मोठे प्रकरण असून शकते.

# १५ ट्रिलियन रुपयांचा लेखापरीक्षण घोटाळा ?




3 जून रोजी सेबीने कंपनीला शेअर बाजारात व्यवहार करण्यास बंदी घातली. त्यानंतर कंपनीचे शेअर्स 80 टक्क्यांनी घसरले आणि शेअरधारकांचे सुमारे 12,726 कोटी रुपयांचे नुकसान झाले. एलआयसीने या कंपनीत 2000 कोटी रुपये गुंतवले होते, त्यापैकी सुमारे 1600 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यांनी असाही आरोप केला, ₹मोदी सरकारच्या नाकाखाली हा घोटाळा 5 वर्षे सुरू राहिला. पंतप्रधानांनी राजेश मेहतासोबत फोटोही काढले आहेत. फसवणूक करणारे आणि कायद्यापासून फरार झालेले लोक मोदी सरकारच्या काळातच सातत्याने परदेशात पळून जात आहेत.
- सुप्रिया श्रीनेत

# नीट यूजी २०२६ पुनर्परीक्षेसाठी शहराची माहिती देणारी स्लिप प्रसिद्ध

**नवी दिल्ली :** नीट-यूजी २०२६ परीक्षा : राष्ट्रीय चाचणी संस्थेने (नॅशनल टेस्टिंग एजन्सी) २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या नीट यूजी पुनर्परीक्षेसाठी शहराची माहिती देणारी स्लिप प्रसिद्ध केली आहे. नोंदणी केलेले उमेदवार आता त्यांच्या परीक्षेच्या शहराची माहिती ऑनलाइन तपासू शकतात.

उमेदवार त्यांचा अर्ज क्रमांक आणि पासवर्ड वापरून neet.nta.ac.in या अधिकृत वेबसाइटवर लॉगिन करू शकतात आणि त्यांना वाटप केलेले परीक्षेचे शहर तपासू शकतात. नीट यूजी पुनर्परीक्षा दुपारी २:०० ते सायंकाळी ५:१५ या वेळेत लेखी (पेन आणि पेपर) पद्धतीने घेतली जाईल. नॅशनल टेस्टिंग एजन्सीनुसार, ही परीक्षा भारतातील ५५१ शहरांमध्ये आणि परदेशातील १४ शहरांमध्ये घेतली जाईल. उमेदवारांनी हे लक्षात घ्यावे की, देण्यात आलेल्या शहर माहिती स्लिपमध्ये केवळ परीक्षेच्या शहराची माहिती असते आणि ते प्रवेशपत्र (ॲडमिट कार्ड) नाही; उमेदवारांनी परीक्षेसाठी काही महत्त्वाची कागदपत्रे तयार ठेवावीत, जसे की त्यांचे प्रवेशपत्र, एक वैध छायाचित्र असलेले ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र किंवा पासपोर्ट यांपैकी एक) आणि पासपोर्ट आकाराचा फोटो. परीक्षेच्या दिवशी ही सर्व कागदपत्रे सोबत आणणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून प्रवेशावेळी कोणतीही अडचण येणार नाही आणि परीक्षा केंद्रात सहज प्रवेश मिळेल.ही शहर सूचना स्लिप प्रवेशपत्र नाही, तर केवळ तुमची परीक्षा कोणत्या शहरात होणार आहे हे सूचित करते आणि आगाऊ माहिती देते.

### नागपूरमध्ये नीट परीक्षेची तयार करत असलेल्या विद्यार्थिनी आकांक्षाने आत्महत्या केली




**नागपूर :** 'नीट'ची विद्यार्थिनी आकांक्षा चतुर्वेदीने आत्महत्या केल्याच्या प्रकरणात एक धक्कादायक खुलासा झाला असून, पोलिसांच्या आत्महत्याप्रकरणी कागदपत्रात सुसाइड नोटच नसल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. या गंभीर चुकीबाबत अंबाझरी ठाण्यातील तपास अधिकारी निखिल तव्हाणे यांना 'शो कॉज'नोटीस बजावण्यात आल्याची चर्चा आहे. 'नीट'च्या विद्यार्थिनीच्या आत्महत्या प्रकरणी स्टेशन डायरीच्या नोंदीत सुसाइड नोटचा उल्लेख असल्याचे सांगण्यात येत आहे; परंतु ही सुसाइड नोट तपासासाठी तयार करण्यात आलेल्या कागदपत्रांत समाविष्ट करण्यात आली नाही. या गंभीर चुकीबाबत संबंधित अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सूत्रांनुसार सुसाइड नोटचा या आत्महत्या प्रकरणाशी निगडित कुठल्याची कागदपत्रांत उल्लेख करण्यात आला नाही. तसेच त्याची माहितीदेखील वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली नाही.

## महत्वाच्या बातम्या

### आजपासून कॉन्स्टेबल भरती परीक्षा सुरू २८ लाख उमेदवार उपस्थित राहण्याची शक्यता

**लखनऊ :** उत्तर प्रदेश पोलिस नागरी पोलीस दलातील कॉन्स्टेबल पदाच्या भरतीसाठीची लेखी परीक्षा राज्यभरात ८, ९ आणि १० जून रोजी घेतली जात आहे. यामध्ये २८ लाखांहून अधिक उमेदवार सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, उमेदवारांच्या सोयीसाठी परिवहन महामंडळाने अतिरिक्त बसेसची व्यवस्था केली आहे. परिवहन राज्यमंत्री दयाशंकर सिंह यांनी सुरक्षित प्रवास आणि वाहतुकीची सुरळीत व्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी सूचना जारी केल्या आहेत. त्यांनी रोडवेजचे व्यवस्थापकीय संचालक पी.एन. सिंह यांना प्रादेशिक व्यवस्थापक आणि सहायक प्रादेशिक व्यवस्थापकांना विशेष सूचना देण्यास सांगितले आहे. विभागीय आणि जिल्हा स्तरावर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल, जे जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभागाशी समन्वय साधतील. प्रमुख बस स्थानकांवर परीक्षा मदत कक्ष स्थापन केले जातील, जिथे उमेदवारांना मार्गदर्शन आणि आवश्यक माहिती मिळेल. परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी तात्पुरते मार्ग बदल आणि अतिरिक्त बससेवा चालवली जाईल.

### IT क्षेत्रात ५ महिन्यांत १ लाख कर्मचाऱ्यांची कपात

**नवी दिल्ली :** Tech Layoffs: जागतिक पातळीवरील सर्वात मोठ्या टेक कंपन्यांमध्ये सध्या मोठे संकट पाहायला मिळत आहे. २०२६ च्या केवळ पहिल्या पाच महिन्यांतच तब्बल १ लाखांहून अधिक टेक कर्मचाऱ्यांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या आहेत. Meta, Amazon, Microsoft, Oracle, Cisco आणि इतर अनेक बड्या कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांची कपात केली आहे. पूर्वी कर्मचाऱ्यांकडून केली जाणारी अनेक कामे आता एआयच्या मदतीने अधिक वेगाने आणि कमी खर्चात पूर्ण होत आहेत. त्यामुळे कंपन्या आपल्या मनुष्यबळाचा आकार कमी करण्याच्या दिशेने पावले उचलत आहेत. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे, कोव्हिड-१९ महामारीच्या काळात झालेली अतिरिक्त भरती. त्या काळात डिजिटल सेवांची मागणी झपाट्याने वाढल्याने अनेक कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर कर्मचारी नियुक्त केले होते. मात्र, आता व्यवसायिक गरजा बदलल्याने कंपन्या खर्चाचे पुनर्संतुलन करत आहेत.

## नीट ओएसएम प्रकरणांची संसदीय समितीने मागितली सीबीएसईने पेपरफुटीची व्याख्या




**नवी दिल्ली :** एका संसदीय समितीने राष्ट्रीय चाचणी संस्थेला (एनटीए) पेपरफुटीच्या व्याख्येबद्दल स्पष्टीकरण देण्यास सांगितले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१८ पासून संस्थेने घेतलेली कोणतीही परीक्षा फुटली आहे का, असाही प्रश्न समितीने विचारला आहे. गेल्या आठवड्यात एनटीएच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर समितीने हे प्रश्न विचारले. सूत्रांनुसार, अधिकाऱ्यांनी सांगितले होते की त्यांच्या प्रणालीमधून कोणताही पेपर फुटला नाही आणि काही प्रश्न केवळ अंदाजासाठी वितरित केले जात होते. काँग्रेस सदस्य दिग्विजय सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय समिती नीट पेपरफुटी प्रकरण आणि सीबीएसईच्या ऑन-स्क्रीन मार्किंग सिस्टीम (OSM) वादाची चौकशी करत आहे. या समितीने एनटीए आणि सीबीएसईमधील अधिकाऱ्यांसह अनेक वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना बोलावले होते. समितीने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) आणि NTA यांच्याकडून अनुक्रमे OSM प्रणाली आणि NEET परीक्षेसंबंधित मुद्द्यांवर लेखी प्रतिसाद मागवला आहे

समितीने गेल्या तीन वर्षांतील एनटीएच्या कर्मचारीसंख्येचा तपशील, २०२२ नंतरची नवीन भरती आणि उच्च शिक्षण विभागाला सादर केलेले वार्षिक अहवालही मागवले आहेत. सूत्रांनुसार, समितीने राधाकृष्णन समितीच्या १०१ शिफारशींपैकी प्रत्येक शिफारशीवर सविस्तर अहवाल आणि एनटीएने केलेल्या कारवाईचा तपशीलही मागवला आहे. ओएसएम प्रणालीतील बदलांबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले. एनटीएमार्फत परीक्षांचे पारदर्शक, सुरळीत आणि निष्पक्ष आयोजन करण्यासाठी शिफारशी देण्याकरिता, इस्रोचे माजी प्रमुख के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीची स्थापना केंद्र सरकारने जून २०२४ मध्ये केली होती.

## तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांच्या हायड्रा वक्तव्यामुळे वाद...

**हैदराबाद :** तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी हायड्राबद्दल केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय वाद निर्माण झाला आहे. भाजप आणि बीआरएसने हे वक्तव्य आक्षेपार्ह असल्याचे सांगत त्यांच्यावर टीका केली आहे. शनिवारी बंगळूरु येथे एका कार्यक्रमात बोलताना रेवंत रेड्डी म्हणाले की, हैदराबादमधील तलाव आणि जलस्रोतांवरील मोठ्या प्रमाणावरील अतिक्रमण पाहिल्यानंतर त्यांनी हायड्रा प्रकल्प तयार करण्याचा निर्णय घेतला. ते म्हणाले, 'गरीब लोक तलाव आणि ओढ्यांवर अतिक्रमण करतात हे मी समजू शकतो. आजकाल श्रीमंत लोक त्यांच्या फार्महाऊससाठी जलस्रोतांवर अतिक्रमण करत आहेत आणि त्यांची गटारे त्या जलस्रोतांना जोडत आहेत. मी या सर्व समस्यांची दखल घेतली आहे. त्यानंतर मी 'हायड्रा' (HYDRAA) नावाचा एक कृती दल (टास्क फोर्स) स्थापन करण्याचा निर्णय घेतला.' मुख्यमंत्री पुढे म्हणाले, 'हायड्रा हा हिटलरचा आवडता शब्द होता. त्याच्या मुख्य पथकाला 'हायड्रा' म्हटले जायचे, जे कोणालाही मारू शकत होते. त्यामुळे, मी हिटलरकडून प्रेरणा घेऊन त्याचे नाव 'हायड्रा' ठेवले आहे.'



ते म्हणाले की, हायड्राच्या स्थापनेनंतर एका वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याची त्याच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी इथेच थांबले नाहीत. हायड्राच्या कारवायांचा संदर्भ देत ते म्हणाले, 'मी मोठ्या प्रमाणावर घातपात घडवून आणला आहे. तुम्ही इराणमधील छायाचित्रे पाहिल्यास, त्यांची तुलना इस्रायलसोबतच्या युद्धात झालेल्या विध्वंसाशी करता येईल.

## सामाजिक बांधिलकी जपणारे दैनिक बहुजन सौरभ : रमेश उंदीरवाडे

**पुणे :** मी नियमित तीन दैनिक वृत्तपत्रे विकत घेऊन वाचतो. मात्र मोबाईलवर ऑफलाईन स्वरूपात उपलब्ध होणारे दैनिक बहुजन सौरभ सर्वप्रथम वाचतो. सामाजिक बांधिलकी जपत हे वृत्तपत्र कार्य करीत असून बातमी लेखनासारख्या विषयावर प्रात्यक्षिक कार्यशाळा घेऊन वाचकांशी मैत्री निर्माण केली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक विचारवंत रमेश उंदीरवाडे यांनी केले. वीर संभाजी ज्येष्ठ नागरिक संघ, रहाटणी–पिंपळे सौदागर, पुणे यांच्या वतीने महात्मा जोतिराव फुले द्विशताब्दी महोत्सव, विज्ञानवादी संत गाडगेबाबा सार्धशताब्दी महोत्सव, महाड सत्याग्रह शताब्दी वर्ष तसेच बहिष्कृत भारत वृत्तपत्राच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित ₹बातमी कशी लिहावी? या विषयावरील प्रात्यक्षिक कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.



कार्यक्रमात दैनिक बहुजन सौरभचे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी बातमी लेखनाचे विविध पैलू, वृत्तसंकलन, शीर्षक लेखन, वृत्तातील वस्तुनिष्ठता आणि पत्रकारितेची सामाजिक जबाबदारी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. परिसरातील घडामोडी समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी नागरिकांनी संवादमित्र म्हणून कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी केशव मेश्राम यांनी वृत्तपत्र हे विश्वासाचे माध्यम आहे, असे सांगितले. डॉ. डी.एस. कोरे यांनी सामाजिक परिवर्तन आणि जनजागृती घडविण्यात वृत्तपत्रांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे नमूद केले. अंकुश सवखंडे यांनी अशा कार्यशाळांमुळे सामान्य नागरिकांनाही बातमी लेखनाची संधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले. अप्पासाहेब कांबळे यांनी झोपडपट्टी, रोजगार आणि सामाजिक प्रश्नांवर चर्चा घडवून आणण्यात वृत्तपत्रांचे महत्त्व अधोरेखित केले. रामनाथ उगले यांनी अल्पावधीत दैनिकासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले, तर महेंद्र गायकवाड यांनी कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. कार्यक्रमात विलास गजभिये यांनी वयाची ६० वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थितांना विविध पुस्तके निःशुल्क भेट देण्यात आली. रविवारी वीर संभाजी उद्यान, रहाटणी–पिंपळे सौदागर येथे ही कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भीमराव सरवदे यांनी केले. संचालन बुवासाहेब अहिवळे यांनी तर आभार प्रदर्शन शशिकांत शेलार यांनी केले. कार्यक्रमास भीमराव सवाई, गुलाब आढाव, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, भाऊराव दहागावकर, विठ्ठल पाटील, यादव वाघमारे, डॉ. शिवअप्पा पसारकर, मनोहर आठवले, राजेंद्र खडसे, दिलीप रहाटे, गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

## नागपूरच्या प्रिन्सेस मेश्राम यांची वर्ल्ड बँक यूथ समिट २०२६ साठी निवड



**नागपूर :** नागपूरच्या प्रिन्सेस मेश्राम यांनी जागतिक स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत प्रतिष्ठित वर्ल्ड बँक ग्रुप यूथ समिट २०२६ साठी प्रत्यक्ष (In-Person) प्रतिनिधी म्हणून निवड मिळविली आहे. ११ व १२ जून २०२६ रोजी अमेरिकेतील वॉशिंग्टन डी.सी. येथील वर्ल्ड बँक मुख्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या या परिषदेत त्या भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. सध्या अमेरिकेतील डॅनियल्स स्कूल ऑफ बिझनेस येथे क्वांटिटेटिव्ह बिझनेस इकॉनॉमिक्सचे शिक्षण घेत असलेल्या प्रिन्सेस यांची निवड अत्यंत स्पर्धात्मक प्रक्रियेनंतर झाली आहे. वर्ल्ड बँक ग्रुप यूथ समिट हे जगातील सर्वात प्रतिष्ठित युवा नेतृत्व मंचांपैकी एक मानले जाते. जगभरातील १७० हून अधिक देशांतील हजारो विद्यार्थी, संशोधक, उद्योजक आणि युवा व्यावसायिक या परिषदेसाठी अर्ज करतात. त्यापैकी केवळ सुमारे ३०० जणांनाच प्रत्यक्ष सहभागाची संधी मिळते. विशेष म्हणजे, प्रिन्सेस यांनी पदवीपूर्व शिक्षण घेत असतानाच या जागतिक दर्जाच्या परिषदेत स्थान मिळविले आहे. प्रिन्सेस या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (GMCH), नागपूर येथील औषधशास्त्र विभागाच्या प्राध्यापक व विभागप्रमुख प्रा. डॉ. चेतना शामकुवार आणि फुफ्फुसरोग विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. सुशांत मेश्राम यांच्या कन्या आहेत.

### आंदोलनातपरीक्षांच्या अनिश्चिततेवरील सीजेपी आंदोलनात तरुण, विद्यार्थी, पालकांचा सहभाग

## जंतरमंतरवर दुमदुमला 'कॉक्रोच'

**नवी दिल्ली :** 'कॉक्रोच जनता पार्टी' (सीजेपी)च्या समर्थकांनी शनिवारी जंतर मंतर येथे केलेल्या आंदोलनात शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन तरुण, स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवार व पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनेकांनी शिक्षण व्यवस्थेतील समस्या, परीक्षा प्रक्रियेतील अनिश्चितता यांमुळे आंदोलनात सहभागी झाल्याचे सांगितले.

सकाळपासून जमाव जमण्यास सुरुवात झाली आणि दिवसभरात तो वाढत गेला. अनेक आंदोलकांनी, परीक्षांभोवती निर्माण होणारे वाद, निकालातील अनिश्चितता व सरकारी अधिकाऱ्यांकडून उत्तरदायित्वाचा अभाव यांमुळे त्यांचा व्यवस्थेवरील विश्वास कमी झाला आहे, असे मत मांडले. काहींनी सत्ताधारी भाजप तसेच विरोधी पक्षांवरही नाराजी व्यक्त करत, तरुणांच्या प्रश्नांकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचे सांगितले. पालकांनीही मुलांवरील वाढत्या तणावाबद्दल चिंता व्यक्त केली. जंतरमंतर येथील आंदोलनादरम्यान २ गटांमध्ये संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी दिल्ली पोलिसांनी शनिवारी सहा जणांना ताब्यात घेतले. या युवा चळवळीच्या समर्थनार्थ व विरोधात असलेल्या गटांमध्ये तणाव निर्माण होण्याची शक्यता असल्यानंतर ही कारवाई झाली.



दिल्लीतील एका स्वयंसेवी संस्थेत काम करणाऱ्या वैशाली यांनी सांगितले की, भारतातील मोठ्या युवकसंख्येचा उल्लेख वारंवार केला जातो; पण त्यांच्या समस्यांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.

काश्मीरमधील कायद्याच्या विद्यार्थिनी सब्रिना यांनीही विद्यार्थ्यांच्या मुद्द्यांना पाठिंबा देण्यासाठी आंदोलनात सहभागी झाल्याचे सांगितले.

एकत्र आवाज उठवल्यास तो अधिक प्रभावी ठरतो, असे त्या म्हणाल्या. काही सहभागींचे म्हणणे होते की, ते कोणत्याही पक्षाशी जोडलेले नाहीत.

**शालेय विद्यार्थीही हजर**

शालेय विद्यार्थ्यांचाही या आंदोलनात सहभाग दिसून आला. दिल्लीतील नथुपूर येथील इयत्ता तिसरीचा विद्यार्थी अभिमन्यू आणि इयत्ता सातवीचा विद्यार्थी अद्वैत यांनी भविष्यातील अनिश्चिततेबद्दल चिंता व्यक्त केली. या सर्व पार्श्वभूमीवर, शिक्षण व्यवस्था, युवकांच्या अपेक्षा आणि शासनातील उत्तरदायित्व यांवर चर्चा घडवून आणणे हा या आंदोलनाचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

**व्यवस्थेविषयी नाराजी :** स्पर्धा परीक्षेचे उमेदवार राजू शर्मा यांनी प्रशासनाच्या चुका विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी गंभीर असल्याचे सांगितले; तर नीरज (हरयाणा) यांनी सांगितले की, आज अनेक युवकांचा सरकार किंवा विरोधक दोघांवरही विश्वास राहिलेला नाही. आयोजनात मदत करणाऱ्या स्वयंसेवकांनीही याच भावना व्यक्त केल्या. मुखवटे तयार करणारे रणजित राज म्हणाले की, राजकीय व्यवस्थेबद्दलची नाराजी ही सहभागींच्या भाषणांत सतत दिसते. ब्लॉगर राज पटेल यांनी आंदोलनातील सर्व मुद्द्यांवरच लक्ष

### निदर्शनानंतर अभिजीत दीपक काय म्हणाले?

अभिजीत दीपके यांनी एका सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले की, काल आपल्यापैकी हजारो लोकांनी इतिहास घडवला. जंतर मंतरवरील आमच्या शांततापूर्ण आंदोलनाने सरकारला दाखवून दिले की, जेव्हा आपण एकत्र येतो तेव्हा झुरळे काय करू शकतात. ते पुढे म्हणाले की, काल आमच्यात सामील झालेल्या बहुतेक लोकांनी यापूर्वी कधीही आंदोलनात भाग घेतला नव्हता. परंतु आमच्या सामूहिक उपस्थितीने त्यांना शिक्षण व्यवस्थेबद्दलचा आपला राग आणि निराशा व्यक्त करण्याचे धैर्य दिले. आपण आवाज उठवला नाही तर बदल होऊ शकत नाही. *'मी तुम्हा सर्वांचे, लहान मुले आणि विद्यार्थ्यांसह, आभार मानू इच्छितो, ज्यांनी कडक उन्हाचा सामना करून हे सिद्ध केले की शांततापूर्ण आंदोलन हीच आपली सर्वात मोठी ताकद आहे. सरकार एका एकजूट आणि शांततापूर्ण आंदोलनाला हानी पोहोचवू शकत नाही. आम्हा झुरळांना त्यांची कधीही भीती बाळगण्याची गरज नाही. पण प्रकरण इथेच संपत नाही. धर्मेंद्र प्रधान यांनी संपूर्ण पिढीवर अन्याय केला आहे. जर त्यांना पदावरून हटवले नाही किंवा त्यांनी पुढील सात दिवसांत स्वतःहून पदाचा राजीनामा दिला नाही, तर आम्हाला जमिनीवर आमचे आंदोलन सुरू ठेवण्यास भाग पडेल.'*



शेर अभी जिंदा है !




वा वाढदिवस

लॉन्ग मार्च प्रणेते
ॲड. सुरेश घाटे

सुख, आनंदाची वैभवी उगवावी पहाट
फुलावी आयुष्यातील स्वप्नांची वाट
संकल्पाना मिळावी नवी दिशा
पूर्ण व्हाव्या मनातील सर्व आशा
हिऱ्यासारखे चमकावे तुमचे कर्तृत्व हीच सदिच्छा



जन्म दि. ८ जून १९४६

शुभेच्छुक : मानसी घाटे, रत्नमाला वडूलवार, मालाबाई सोनार, रत्ना नगराळे, प्रिया तायडे, सुप्रिया कांबळे, राधा मिश्रा, कॉम्रेड सरोज मेश्राम, पँथर सुनील जांभुळकर, पायलट राजेश पाटील, सुवर्णा चव्हाण आणि रस्त्यावर लढा देणारे आंबेडकरी कार्यकर्ते व बहुजन सौरभ वितरक, प्रचारक धम्मचारी केवल रामजी कांबळे.

सोमवार, ०८ जुन २०२६
Monday, 08 June 2026

“ मानवी नात्यांमध्ये सर्वात मोठा शत्रू म्हणजे गैरसमज... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



बहुजन सौरभ

# संपादकीय

## अंधश्रद्धेवर विवेकाचा विजय

समाजात अंधश्रद्धेचा प्रश्न हा केवळ धर्माचा किंवा श्रद्धेचा नसून तो सामाजिक, आर्थिक आणि मानसिक असुरक्षिततेशी जोडलेला प्रश्न आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगातही जादूटोणा, बुवाबाजी, नवस, महागडी पूजाअर्चा, ग्रहशांती, अनुष्ठाने आणि तथाकथित चमत्कार यांच्या नावाखाली करोडो रुपयांची उलाढाल होत आहे. विशेष म्हणजे या व्यवस्थेत महिलांची संख्या अधिक दिसते. त्यामुळे अनेकदा असा आरोप केला जातो की अंधश्रद्धेच्या बाजारातील सर्वात मोठी ग्राहक आणि वाहक स्त्रीच आहे. परंतु हा प्रश्न केवळ स्त्रियांवर दोषारोप करून सुटणारा नाही. त्यामागील वास्तव समजून घेणे गरजेचे आहे. भारतीय समाजव्यवस्थेत शतकानुशतके स्त्रीला घर, कुटुंब आणि धार्मिक परंपरांची संरक्षक म्हणून घडवण्यात आले. मुलाच्या जन्मापासून लग्नापर्यंत, पतीच्या आरोग्यापासून कुटुंबाच्या सुख-समृद्धीपर्यंत अनेक धार्मिक विधी आणि व्रतवैकल्यांची जबाबदारी तिच्यावर सोपवली गेली.हे ‘केले नाही तर अनर्थ होईल’ अशी भीती तिच्या मनात लहानपणापासून रुजवली गेली. परिणामी ती अनेक गोष्टींवर प्रश्न विचारण्याऐवजी त्या परंपरेचा भाग बनत गेली. आजही अनेक घरांमध्ये मुलीला सांगितले जाते की व्रत केल्याने पतीचे आयुष्य वाढते, नवस केल्याने मुलाला नोकरी लागते किंवा ग्रहशांती केल्याने संकट दूर होते. अशा शिकवणीमुळे अंधश्रद्धा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत राहते. यात अनेकदा सासू-सुना, आई-मुलगी या नात्यांमधून परंपरेचा दबाव निर्माण होतो. त्यामुळे स्त्री अंधश्रद्धेची निर्माती नसून अनेकदा त्या व्यवस्थेची बळीही असते. दुसरीकडे, ढोंगी बाबा, बुवा आणि तथाकथित धर्मगुरूंनी समाजातील असुरक्षिततेचा मोठा बाजार उभा केला आहे. बेरोजगारी, कौटुंबिक कलह, व्यसनाधीनता, आजारपण किंवा वैवाहिक अडचणी यांसारख्या समस्यांवर वैज्ञानिक किंवा सामाजिक उपाय शोधण्याऐवजी अनेकांना धार्मिक कर्मकांडांचे आमिष दाखवले जाते.अनेक तथाकथित बाबा, पुजारी, तांत्रिक आणि धर्मव्यवसायिक हे पुरुषच आहेत. त्यामुळे संपूर्ण दोष स्त्रीवर टाकणे वास्तवाला धरून ठरत नाही. हेही खरे आहे की घरातील आर्थिक नियोजनाकडे दुर्लक्ष करून अनेकदा नवस, व्रत, जागरण, मोठ्या देणग्या किंवा दिखाऊ धार्मिक कार्यक्रमांवर मोठा खर्च केला जातो. घरात मूलभूत गरजांची कमतरता असताना हजारो रुपयांची पूजा किंवा देणगी देणे ही चिंतेची बाब आहे. श्रद्धा वैयक्तिक असू शकते, पण ती विवेकशून्य खर्चामध्ये बदलली तर त्याचा फटका संपूर्ण कुटुंबाला बसतो. याच संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अत्यंत मार्गदर्शक ठरतात. बाबासाहेबांनी धर्माचा विरोध केला नाही, परंतु धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अंधश्रद्धा, कर्मकांड आणि शोषणाचा त्यांनी कठोर विरोध केला. त्यांचे मत होते की, माणसाच्या जीवनात बुद्धी, तर्क आणि चिकित्सक विचार यांना सर्वोच्च स्थान असले पाहिजे. विचारशक्ती गमावलेला समाज सहजपणे अंधश्रद्धेच्या जाळ्यात अडकतो आणि त्याचे आर्थिक व सामाजिक शोषण होते. बाबासाहेबांनी वंचित समाजाला आवाहन केले होते की, आपल्या कष्टाची कमाई अंधश्रद्धा आणि कर्मकांडांवर खर्च करण्यापेक्षा शिक्षण, संघटन आणि संघर्षासाठी खर्च करा. त्यांचे प्रसिद्ध ब्रीदवाक्य ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हे केवळ राजकीय परिवर्तनाचे नव्हे, तर वैचारिक मुक्तीचेही सूत्र आहे. अंधश्रद्धेतून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हा सर्वात प्रभावी मार्ग आहे, असे ते मानत होते. महिलांच्या संदर्भात बाबासाहेबांचा दृष्टिकोन अत्यंत पुरोगामी होता. त्यांनी स्त्रीला समान हक्क, शिक्षण आणि स्वाभिमान मिळावा यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. स्त्रीने अंधानुकरण न करता विवेकाचा स्वीकार करावा, अशीच त्यांच्या विचारांची दिशा होती. शिक्षित आणि स्वावलंबी स्त्री ही अंधश्रद्धेची वाहक नसून परिवर्तनाची शिल्पकार ठरू शकते. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौद्ध धम्म स्वीकारताना बाबासाहेबांनी घेतलेल्या २२ प्रतिज्ञांमध्ये देवदेवतांच्या अंधभक्तीचा, श्राद्ध-पिंडदानासारख्या कर्मकांडांचा आणि शोषणाला पोषक ठरणाऱ्या धार्मिक रूढींचा त्याग करण्याचा निर्धार व्यक्त केला. या प्रतिज्ञांचा मूळ संदेश हाच होता की, माणसाने आपल्या बुद्धीवर आणि स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवावा. अंधश्रद्धेचा सर्वात धोकादायक परिणाम म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव. एखादे मूल आजारी पडल्यास डॉक्टरांकडे जाण्याऐवजी झाडफूक केली जाते, मानसिक आजारांना भूतबाधा समजले जाते किंवा शेतीतील संकटाला ग्रहदोष ठरवले जाते. अशा विचारसरणीमुळे समाज प्रगतीपासून दूर जातो. भारतीय राज्यघटनेतील नागरिकांचे मूलभूत कर्तव्यही वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद आणि चिकित्सक वृत्ती विकसित करण्याचे आहे. महिलांच्या शिक्षणाचा आणि आर्थिक स्वावलंबनाचा या प्रश्नाशी जवळचा संबंध आहे. ज्या स्त्रिया शिक्षित, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि माहितीच्या आधुनिक साधनांशी जोडलेल्या आहेत, त्या अनेकदा अंधश्रद्धेला प्रश्न विचारतात. त्यामुळे अंधश्रद्धेविरुद्धची लढाई ही स्त्रीविरोधी नसून स्त्री-सक्षमीकरणाची लढाई आहे. ज्या समाजात स्त्री विचार करेल, प्रश्न विचारेल आणि निर्णय प्रक्रियेत समान सहभाग घेईल, त्या समाजात बुवाबाजीचा प्रभाव कमी होईल. त्याचबरोबर पुरुषांनीही स्वतःची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. अनेक पुरुष स्वतः ज्योतिष, वास्तुशास्त्र, रत्न, तांत्रिक उपाय आणि विविध प्रकारच्या अंधविश्वासांमध्ये अडकलेले दिसतात. त्यामुळे विवेकाची अपेक्षा केवळ स्त्रियांकडून ठेवता येणार नाही. अंधश्रद्धा ही स्त्री किंवा पुरुष यांची स्वतंत्र समस्या नसून संपूर्ण समाजाची समस्या आहे. आज गरज आहे ती श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक समजून घेण्याची. श्रद्धा माणसाला नैतिक बळ देऊ शकते, परंतु अंधश्रद्धा त्याच्या विचारशक्तीवर पडदा टाकते. देवावर विश्वास ठेवणे हा वैयक्तिक अधिकार आहे, पण त्या विश्वासाच्या नावाखाली भीती, शोषण आणि आर्थिक लूट चालणार असेल तर त्याला विरोध करणे ही सामाजिक जबाबदारी आहे.समाजात परिवर्तन घडवायचे असेल तर घरातूनच सुरुवात करावी लागेल. मुलांना प्रश्न विचारायला शिकवले पाहिजे. महिलांना निर्णयस्वातंत्र्य आणि शिक्षण दिले पाहिजे. धार्मिक परंपरांचा आदर राखत विवेकाला महत्त्व दिले पाहिजे. कोणताही बाबा, बुवा किंवा धर्मगुरू आपल्या समस्यांपेक्षा मोठा नाही, हा आत्मविश्वास समाजात निर्माण झाला पाहिजे. अंधश्रद्धेविरोधातील लढा हा कोणत्याही धर्माविरुद्ध किंवा स्त्री-पुरुषांविरुद्ध नसून अज्ञान, भीती आणि शोषणाविरुद्ध आहे. ज्या दिवशी प्रत्येक व्यक्ती-स्त्री आणि पुरुष दोघेही-कोणत्याही चमत्काराच्या दाव्यापुढे एक साधा प्रश्न विचारतील, ‘याचा पुरावा काय?’, आणि डॉ. बाबासाहेबांच्या ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ या विचाराला जीवनात उतरवतील, त्या दिवशी अंधश्रद्धेच्या बाजाराची पायाभरणी आपोआपच ढासळू लागेल. ●●

# चळवळीचे स्पॉन्सरशिप धोक्याचे !

**गुलामीतून मुक्त व्हायचे असेल तर ज्यांच्यापासून आपल्याला मुक्तता हवी त्यांचा आधार घेऊन किंवा त्यांच्या आश्रीत राहून होता येत नाही. गुलामाला इच्छा - आकांशा नसतात.त्याला स्वतंत्रपणे आणि आपल्या ताकदीवर उभे राहावे लागते.**

स्वाभिमानी आणि शत्रू - मित्राची ओळख असणाऱ्याला मात्र ते शक्य आहे. त्यासाठी त्याला सर्वस्व बहाल करावे लागते. जगातल्या क्रांत्या आपल्यातील गुलामीची जाणीव झालेल्या लोकांनीच केल्या. अमेरिकेतील काळा - गोरा (वंशवाद) संघर्ष, फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास, जपानच्या दोन समूहातील संघर्ष आम्हाला ठाऊक आहे. संघर्षात गोऱ्या लोकांनी काळ्या लोकांना साथ दिली. काही देशात आंदोलनकर्त्यांना मानवी मूल्यांच्या आधारावर स्वकियांशी विद्रोह केला. भारतात मात्र तसे झाले नाही. भारतात शूद्र अतिशूद्र - शेटजी भटजीच्या लढायीत ब्राह्मणांनी शूद्र अतिशूद्राला साथ दिली. नाही.तशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे. ते त्यांना शक्यही नव्हते. भारतात बुद्धाने केलेली सामाजिक क्रांती, संत रैदास - कबीरांचे आंदोलन किंवा आधुनिक भारतात राष्ट्रपिता ज्योतिबा फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र क्रांतिकारी आंदोलन स्वाभिमानाचे मानवी अधिकाराचे आंदोलन होते. या बहुजन नायक - नायीकांनी ज्यांच्या विरोधात चळवळ केली त्यांची साथ घेतली नाही. त्यांनी स्वतःचे साधन - संसाधन निर्माण केलेत. ते लढले आणि जिंकलेत सुद्धा! आम्ही अनुयायी म्हणून या स्वाभिमानी चळवळ चालवण्यात किती यशस्वी झालोत, याची समीक्षा करण्याची ही वेळ आहे. जागतिकिरणाने स्पर्धा निर्माण केली आहे. या स्पर्धेत टिकायचे असेल,तर तुमच्याकडे उपलब्ध असलेल्या घटकांबरोबर इतर बाबींची साथ घ्यावी लागते, ही मान्यता कोणीही नाकारू शकणार नाही. मात्र हे करत असताना तुमच्या ती अटीवर नसेल तर मग परत नव्या प्रकारची गुलामी ओढून घेतल्यासारखे होईल. ही बाब सर्वच क्षेत्रात लागू आहे. आज आम्ही नव्या गुलामीसाठी रेड कार्पेट अंथरत तर नाही ना ? असा प्रश्न पडतो. कोणतीही गोष्ट करायची असेल अगदी मोहल्यातल्या एखाद्या पंगतीला आम्ही स्पॉन्सर्स शोधतो आणि तोही कोण? तर ज्याने आम्हाला शेकडो वर्षापासून सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक गुलाम केले! नागपूर हे चळवळीचे केंद्र आहे. अशी जगात नागपूरची मान्यता आहे आणि ते खरेही आहे. नागाच्या या नागभूमीला केंद्रस्थानी ठेवून डॉ.बाबासाहेबांनी 1920 पासून ते 1956 पर्यंत स्वाभिमानाची लढायी लढली. त्यासाठी तितक्याच स्वाभिमानाने अशिक्षित परंतु प्रामाणिक लोकांनी बाबासाहेबांना साथ दिली. पै -पै जमा करून चळवळ जिवंत ठेवली. दीक्षा समारंभात जमा झालेल्या पैशाच्या तपशीलावरून आणि खर्चावरून याची कल्पना येते. या महान कार्यासाठी बाबासाहेबांनी इतर कोणाचीही मदत घेतली नाही. कार्यकर्त्यांनी सुद्धा कोणी स्पॉन्सर शोधला नाही. आज मात्र दीक्षाभूमीचे (काही अपवाद) बहुतांश कार्यक्रम स्पॉन्सरशिवाय चालत नाहीत. याचा परिणाम शेवटी असा झाला. शहराशहरात निर्माण झालेल्या विहारांसाठी स्पॉन्सर शोधल्या जावू लागले. मग कोणाकडून बुद्ध मूर्ती, कोणाकडून वाल कंपाउंड बांधण्यासाठी नगरसेवक - खासदारांना साकडे घातले जावू लागले. 'जो देता है वह इशारा भी करता है' या वास्तविकतेची प्रचिती यायला लागते. अशा कित्येक विहाराला राजकीय नेत्यांच्या बॅनरने झाकल्याचे आम्ही उघड्या डोळ्यांनी बघतो. नितीन गडकरीकडून दरवर्षी धम्म परिषदांचे भव्य आणि दिव्य आयोजन होते. एका ब्राह्मणाला बौद्ध धर्म वाढावा,असे आम्हाला वाटत असेल तर त्याला मानसिक दिवाळखोरी म्हणावी की शुद्ध बेईमानी ! आज गावागावात हिच परिस्थिती आहे. समस्त बहुजन समाज अशाच मानसिकतेने ग्रासलेला आहे. अनुसूचित जाती - जमती आणि ओबीसीमध्ये निर्माण झालेले तथाकथित नेते आपल्या जातीत आरएसएसचा छुपा अजेंडा खुलेआम राबवत आहेत. त्यांची भाषा -देहबोली बघता ते किती मग्रूर आहेत,हे दिसून येते. समाजाला चालवण्याचा ठेका जणू आपल्याला मिळाला, अशी त्याची कृती असते. बहुजन महापुरुषांबरोबर रामकथा, हनुमान जयंतीचा जल्लोष करायला तो अग्रणी असतो. त्यासाठी आमदार - खासदारांकडून निधीची व्यवस्थाही केली जाते. अशा कामाला नेते न सांगता मदत करतात. त्यांचा डोळा मतावर असतो. नेते - कार्यकर्ते मात्र साहेबांनी मदत केली म्हणून खुष असतात. गुलाल उधळतात. खाणे पिणे होते. अलीकडे जाती जातीची संमेलने होवू लागली आहेत, त्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ब्राह्मण नेते - मंत्र्याला बोलवले जाते. कारण तोच त्या संमेलनाचा स्पॉन्सर असतो. पैशाची कमी नसते. राजकीय परिस्थिती यापेक्षा बिकट आहे. 75 वर्षे काँग्रेस आणि भाजपने काही केले नाही, हे माहित असूनही भाजपला सत्तेपासून रोखण्यासाठी आमच्यातील स्वयंघोषित विद्वान काँग्रेसला साथ देण्याचे अपील करतात. स्वतः भाजप - काँग्रेस पक्षांना पर्याय न देता त्यांच्यासमोर लोटांगण घालतात. फुले - आंबेडकरांचे नाव घेणारे कितीतरी पक्ष भाजप - काँग्रेस पुरस्कृत आहेत. विशेष म्हणजे ही बाब सगळ्यांनाच माहित आहे. बुद्धाचा




कार्यकारणभाव सांगतो की कोणतीही कृती वा घटना घडते त्याला निश्चित असे कारण असते. आपल्या परावलंबित्वाची सुद्धा अनेक कारणे आहेत. अज्ञान, शत्रू - मित्राची ओळख, आंदोलनाबाबत अनास्था सारखी अशी कितीतरी करणे सांगता येतील. लोकांना आपल्या हयातीत सर्व पाहिजे. परंतु क्रांती एका दिवसात होणारी घटना किंवा कृती नाही. याची जाणीव त्यांना नाही. लोक आपला उत्कर्ष दुसऱ्याच्या प्रयत्नातून करू पाहतात. अशा वेळी ते ना समाजाचा विचार करत ना त्यांना स्वाभिमानाशी काही देणे घेणे असते. स्वाभिमानाला प्राधान्य देवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले समग्र आंदोलन चालवले. जेथे माणसाचे माणुसपण नाकारले जाते त्या हिंदु धर्माच्या (ब्राह्मणी धर्म) ठेकेदारांना त्यांनी अनेक प्रश्न केलेत. अशा वेळी आपल्या लोकांनाही त्यांनी सावध केले. वेळ प्रसंगी कान सुद्धा पिळलेत. त्यांना एक आदर्श समाज निर्माण करायचा होता. त्यासाठी त्यांनी आपले सर्वस्व पनाला लावले. जाती व्यवस्था कायम ठेवून ते करणे शक्य नव्हते. त्यासाठी त्यांच्या अनुयायांनी जीवाची बाजी लावावी अशी त्यांची अपेक्षा होती. 17 आगस्ट 1952 ला त्यांनीच स्थापित केलेल्या सिद्धार्थ महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात बाबासाहेब म्हणतात, अस्पृश्यांच्या उत्थानासाठी एका व्यक्तीने 25 वर्षात जे करायचे होते ते जगात कोणत्याही व्यक्तीने केले नाही. ते मी एकट्याने तुमच्यासाठी केले. मी सर्वप्रथम तुमच्यात स्वाभिमानाची भावना निर्माण केली. हे कार्य मला सर्वात जास्त महत्वाचे वाटले. माझ्या आंदोलनापूर्वी अस्पृश्य समाजाची स्थिती जनावरापेक्षा बिकट होती. तो समाज अशा मानवताहीन परिस्थितीत संतुष्ट होता.मी अथक संघर्षातून अन्यायाच्या विरुद्ध लढण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण केले.हे साधारण कार्य नाही. ही जाणीव बाबासाहेब का करून देतात, कारण त्यावेळी समाज जयजयकार करण्यातच व्यस्त होता. तसा तो आजही आहे. दुसऱ्याच्या मर्जीवर आपले आंदोलन निर्माण करणे शक्य नाही आणि तसा प्रयत्न केला तर त्याला आंदोलन म्हणता येणार नाही. त्यामध्ये स्वाभिमान नसतो.बाबासाहेबांचे समकालीन पेरियार रामासामींनी ब्राह्मणांना व त्यांच्या धर्मशास्त्रांना खुले आव्हान दिले होते. ब्राह्मणांच्या मानसिक आणि शारीरिक गुलामीतून मुक्त होण्यासाठी त्यांनी सेल्फ रिस्पेक्ट मूवमेंट चालवली. पेरियार आपल्या भाषणात म्हणतात, ‘आत्मसन्मान चळवळीचा उद्देश भारतीय समाजात जातीयतेने पीडित असलेल्यांमध्ये आत्मसन्मानाची भावना रुजवणे आणि भारतीय समाजात समानता प्रस्थापित करणे हा आहे. या चळवळीचा उद्देश केवळ देवतांना विरोध करणे हा नाही; तर भारतीय लोकांचा गमावलेला आत्मविश्वास परत मिळवणे हा आहे’. पुढे पेरियार असेही म्हणतात की, या चळवळीच्या माध्यमातून, समाजात जातीमुळे प्रचलित असलेला भेदभाव दूर करून आम्ही बंधुभाव प्रस्थापित करण्यासाठी कार्य करू. हे एक प्रकारचे 'निस्वार्थ कार्य' आहे, म्हणजेच कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता केलेले कार्य. या चळवळीचा पाया कार्यकारणभावाच्या पद्धतीवर रचलेला आहे. हेच तिचे तत्त्वज्ञानही आहे. कोणत्याही घटनेमागील कारण शोधणे, मुळापर्यंत जाणे आणि समाजात प्रचलित असलेले अज्ञान नष्ट करणे हा आत्मसन्मान चळवळीचा उद्देश आहे.’ ही विचारधारा नंतर पेरियार यांच्या जीवनाचा गाभा बनली. ते म्हणायचे की, योग्य-अयोग्य समजून घेणे आणि नवीन गोष्टींचा शोध लावणे हेच चळवळीचे कार्य आहे. आज परत स्वाभिमानाची चळवळ जिवंत करण्याची आवश्यकता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनातून एक सक्षम, बुद्धीजीवी आणि अधिकारी वर्ग निर्माण झाला आहे. सोबतच संविधानसारखे राष्ट्र निर्मितीचे दस्तावेज आहे. आम्ही आमची नैतिक आणि संविधानिक जबाबदारीचे निर्वाहन केले पाहिजे व बाबासाहेबांच्या स्वप्नातील आदर्श समाज निर्माण करण्यासाठी जीवाची बाजी लावली पाहिजे.●●



जीवन गावंडे
7350442920

# जयभीम’चा नारा आणि परिवर्तनाचा मार्ग

**मी भारतासाठी निघालो आहे. मी माझे भविष्य संविधानाच्या हाती सोपवतो. जयभीम!” अभिजित दीपके (कॉक्रोच जनता पार्टी) यांची ही पोस्ट सध्या फेसबुक आणि इन्स्टाग्रामसह विविध सोशल मीडिया माध्यमांवर मोठ्या प्रमाणावर फिरत आहे.**

या पोस्टमधून अभिजित दीपके यांनी ‘जयभीम’चा नारा मा. कांशीरामजी यांच्या आर्थिक मुक्ती आणि सामाजिक परिवर्तन आंदोलनानंतर पुन्हा एकदा बुलंद केल्याचे स्पष्ट दिसून येते. कॉक्रोच जनता पार्टी : एका उद्रेकाची अभिव्यक्ती ‘कॉक्रोच जनता पार्टी’ (CJP) ही तरुण राजकीय रणनीतिकार अभिजित दीपके यांनी सुरू केलेली डिजिटल आणि उपरोधिक राजकीय चळवळ आहे. देशातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांची तुलना कथितपणे‘झुरळांशी आणि ‘परजीवींसारखी’ केल्याच्या वक्तव्याविरोधात निर्माण झालेल्या संतापाचे हे संघटित डिजिटल रूप मानले जाते. जेव्हा सत्तास्थानी असलेली एखादी व्यक्ती एका तेजस्वी राष्ट्राच्या अंधाऱ्या कोपऱ्यात ढकलल्या गेलेल्या तरुणांची तुलना ‘झुरळां’शी करून त्यांना तुच्छ, चिवट, निरुपयोगी आणि घाणेरडे ठरवते, तेव्हा अपमानित वर्ग त्या अपमानालाच प्रतिकाराचे प्रतीक बनवतो. ‘कॉक्रोच जनता पार्टी’ ही अशाच प्रतिकारातून जन्मलेली चळवळ आहे. उद्रेक म्हणजे एखाद्या भावनेचा अचानक झालेला स्फोट किंवा तीव्र अभिव्यक्ती. ही चळवळ देखील तरुणांच्या मनातील असंतोषाचा, दमन आणि शोषणाविरोधातील रोषाचा उद्रेक आहे. हा उद्रेक डिजिटल माध्यमातून व्यक्त झाला असला तरी त्याकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही, कारण आधुनिक समाजजीवनात डिजिटल माध्यमे अपरिहार्य बनली आहेत. अभिजित दीपके कोण आहेत?: मूळचे छत्रपती संभाजीनगर (वाळूज) येथील अभिजित दीपके यांनी पुण्यात पत्रकारितेचे शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी अमेरिकेतील बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये जनसंपर्क (Public Relations) विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले. २०२० ते २०२३ या काळात त्यांनी आम आदमी पार्टीच्या सोशल मीडिया विभागातही काम केले होते.




**चळवळीची वैशिष्ट्ये:**

सोशल मीडियावर, विशेषतः इन्स्टाग्रामवर, या चळवळीला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. काही दिवसांतच तिच्या फॉलोअर्सची संख्या अनेक प्रस्थापित राजकीय पक्षांनाही मागे टाकणारी ठरली. ही पारंपरिक राजकीय पक्षसंस्था नसून व्यवस्था परिवर्तनाची भाषा करणारी तरुणांची उपरोधिक चळवळ आहे. बेरोजगारी, शिक्षणव्यवस्थेतील भ्रष्टाचार, विद्यार्थ्यांचे हक्क आणि सामाजिक न्याय यांसारख्या मुद्द्यांवरून ती आवाज उठवत आहे. अभिजित दीपके यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलनाची हाक देत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली होती. देश कोणत्याही पक्षापेक्षा मोठा असतो. त्यामुळे देशहित, लोकशाही आणि जनतेचा आवाज यांना सर्वोच्च स्थान मिळाले पाहिजे, ही या चळवळीची घोषित भूमिका आहे. आजची तरुणाई आणि वाढती आव्हाने:आज देशातील तरुण पिढी अनेक समस्यांना सामोरी जात आहे. हाताला काम नाही, रोजगाराच्या संधी कमी होत आहेत आणि शिक्षणव्यवस्था विविध प्रकारच्या वैचारिक संघर्षात अडकत चालली आहे. शिक्षणाचे वाढते खासगीकरण, अभ्यासक्रमातील वैचारिक हस्तक्षेप आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाऐवजी धार्मिक कट्टरतेचा प्रभाव वाढण्याची भीती यामुळे उद्याची पिढी संशोधक, वैज्ञानिक किंवा विचारवंत होण्याऐवजी धर्मांधतेच्या दिशेने ढकलली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. बेरोजगारी, आर्थिक विषमता आणि सामाजिक असुरक्षितता यांमुळे तरुणांमध्ये भविष्याबद्दलची चिंता वाढत आहे. त्याचबरोबर जात, धर्म, भाषा आणि एककल्ली राजकारणाच्या आधारावर समाजाचे ध्रुवीकरण करण्याच्या प्रवृत्तीदेखील बळावत आहेत.

‘जयभीम’ आणि अण्णाभाऊ साठेंचा संदर्भः अभिजित दीपके यांच्या ‘जयभीम’च्या घोषणेमागे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रसिद्ध ओळींचा संदर्भ दडलेला दिसतो. “जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव.”या ओळी केवळ काव्य नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनवादी विचारांचे सार आहेत. येथे ‘घाव’ म्हणजे हिंसा नव्हे. तो अन्याय, विषमता, अज्ञान, शोषण, अंधश्रद्धा आणि भेदभाव यांच्यावर विवेक, शिक्षण आणि लोकशाहीच्या माध्यमातून केलेला वैचारिक प्रहार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषित, वंचित आणि पीडित समाजाला हक्क, स्वाभिमान आणि संविधानिक अधिकार मिळवून दिले. त्यांनी विषमतेवर आणि अन्यायावर घाव घालत नवा समाज उभारण्याचा मार्ग दाखविला. त्याच परिवर्तनवादी विचारांचा धागा पकडून अण्णाभाऊ साठे ‘जग बदल’चा संदेश देतात. आजच्या काळातील ‘घाव’ म्हणजे काय?: आजच्या परिस्थितीत अण्णाभाऊंच्या या ओळी अधिक व्यापक अर्थाने समजून घ्याव्या लागतील. ‘जग बदल’ म्हणजे केवळ सत्ता बदल नव्हे, तर विचारांचा, मूल्यांचा आणि सामाजिक संरचनेचा बदल होय. आजच्या तरुणांना व्यवस्थेतील उणिवांवर खालील प्रकारे ‘घाव’ घालण्याची गरज वाटत आहे – अज्ञानावर विवेकवादी शिक्षणाचा घाव. – भ्रष्टाचारावर पारदर्शकतेचा घाव. – द्वेषावर बंधुभावाचा घाव. – अन्यायावर संविधानिक संघर्षाचा घाव. बेरोजगारीवर कौशल्य आणि संधी निर्माण करण्याचा घाव. – अंधभक्तीवर चिकित्सक विचारांचा घाव. अंधश्रद्धेवर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा घाव. विषमतेवर सामाजिक न्यायाचा घाव.

**निष्कर्ष:** आज देशासमोर बेरोजगारी, आर्थिक विषमता, सामाजिक आणि धार्मिक ध्रुवीकरण, अंधश्रद्धा आणि लोकशाही मुल्यावर प्रहार असे अनेक आव्हान उभे ठाकले आहे. अशा वेळी संविधान, विवेक, विज्ञान, बंधुता आणि लोकशाही यांच्या आधारावर परिवर्तन घडविण्याची आवश्यकता अधिक तीव्रतेने जाणवते. अभिजित दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज आणि अण्णाभाऊ साठे यांच्या परिवर्तनवादी विचारांचा मार्ग स्वीकारला, तर ही चळवळ केवळ डिजिटल असंतोष न राहता विधायक सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनू शकते. अन्याय, विषमता, धर्मांधता आणि अज्ञान यांच्याविरुद्ध संविधानिक आणि लोकशाही मार्गाने संघर्ष करून समाज बदलविणे, हाच खऱ्या अर्थाने “जग बदल घालुनी घाव” या संदेशाचा आशय आहे.●●

भगवान बुद्धांची शिकवण



आर. के. जुमळे
93264 50506

बहुजन मानस





नागेश चौधरी (बहुजन विचारवंत)
९९७०८७३५६०

# हिरो आणि व्यवस्था परिवर्तन

**एक व्यक्ती कितीही मोठी म्हटली, तरी ती व्यक्ती, तो नेता व्यवस्थेसमोर बिंदू मात्र असतात आणि व्यवस्था अशा व्यक्तिंना, नेत्यांना पचवून टाकते किंवा पराभूत करते. व्यक्तिकेंद्री व्यवस्था परिवर्तनाची मोहीम तेव्हाच यशस्वी होते, जेव्हा ते विचार बहुसंख्य लोकांच्या मन-मेंदुवर हावी होतात.**

आजची ब्राह्मणी व्यवस्था ही व्यक्ती केंद्री वा नेता केंद्री नाही. तिने लोकांच्या मन मेंदुवर कब्जा मिळवला आहे. या व्यवस्थेला आव्हान देणारे थोर नेते तयार झाले. अगदी गौतम बुद्धापासून आजपर्यंतच्या समतावादी थोर नेत्यांपर्यंत, पण तरीही आज ब्राम्हणी व्यवस्था आपले पाय घट्ट रोवून आहे की नाही? या थोरांच्या प्रयत्नांनी व्यवस्थेला थोडे फार धक्के बसले. ब्राह्मणी व्यवस्था एक नेतागामी नाही. कुण्याही एका नेत्याला ती आपल्या वर मानत नाही. ती कुण्या एका नेत्याच्या तालावर नाचत नाही किंवा त्या नेत्याला देव बनवत नाही किंवा त्याच्यामुळेच आमचे भले झाले आम्ही किंवा आमची जात त्यांच्यामुळेच सर्वाच्या वर आहे असे मानत नाही. ही व्यवस्था एका व्यक्तीला मग ती व्यक्ती कितीही प्रभावशाली, शक्तीशाली असली तरी तिला पराभूत करते, कारण एक व्यक्ती त्यांच्या व्यवस्थेची बरोबरी करू शकत नाही. गव्हर्निंग क्लासः इथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा Governing class सत्ताधारी वर्गाचा (जमातीचा) विचार मनात येतो. गव्हर्निंग क्लास-सत्तासिन जमात/वर्ग असतो. व्यक्ती नसते. त्यांनी What Congress and Gandhi have done to the untouchables या प्रबंधात याची जाणीव दिली आहे की Brahmins are the Governing class ब्राह्मण हा सत्ताधारी वर्ग आहे. अर्थात, इथे वर्ग आणि वर्ण हे एकच आहे असाही संकेत दिला आहे. ब्राह्मणी सत्ताधारी वर्गाला पर्यायी वर्ग कोणता राहू शकेल याचा विचार केला तर काय उत्तर आहे? इथे त्यांनी भांडवलदार वर्गाला Governing class म्हटले नाही. कारण त्यावेळी ही स्थिती होती की भांडवलदार सुद्धा ब्राह्मणांसमोर दुय्यम होते आणि हे आज तर आणखी प्रखरपणे स्पश्ट सत्य आहे. Capitalists under the Brahmins टाटा, वा भांडवलदार जेव्हा RSS समोर दुय्यमत्त्व स्वीकारतात (टाटा मोहन भागवतांच्या भेटीला जातात) भांडवलदार, कारखानदार RSS चे वर्चस्व मान्य करतात. कुठल्याही शहरातील भांडवलदार हा ब्राह्मणाच्या वर नाही. तो ब्राह्मण जातीला वर मानतो. म्हणजे इथे ब्राह्मणी संस्कृती, व्यवस्था ही भांडवली संस्कृतीवर मात करते. ही व्यवस्था मोडीत काढण्यासाठी एक नेता, हिरो पुरेसा ठरत नाही. कारण ब्राह्मणी व्यवस्था ही 'हिरो' वर अवलंबून नाही. ब्राह्मण समूह म्हणून नेतेपदी आरूढ आहे. तशी स्थिती इतर कुठल्याही समूह, जातीची नाही. कारण ती जात/समूह मूल्य निर्माणात खूप खुजी आहे. म्हणून ती आम 'हिरो' ला कल्याणकारी समजते आणि एकटा हिरो व्यवस्था निर्माण करू शकत नाही. परंतु त्यांच्या कर्तृत्वाने, पराक्रमाने वा परिश्रमाने ही व्यवस्था थोडी वाकते, थोडे कन्सेशन देते आणि वंचित समूहाला तो 'हिरो' महान कल्याणकारी वाटतो. कारण जे मिळते ते ऐतिहासिक काळात मिळाले नव्हते. ती त्यांना ऐतिहासिक देण वाटते. मग या दमित समूहाला ती व्यक्ती, तो 'हिरो' महान वाटतो. परंतु व्यवस्था अशा 'हिरो'ना समरस करण्यात वाकबगार असते. ती त्याचाही उदोउदो करायला लागते. आणि मग त्याचे क्रांतीकारत्त्व धुसर व्हायला लागते. व्यवस्था त्याच्या अनुयायातील मुखंडाना साम, दाम देऊन आपल्याकडे वळते करून घेते. अशा रितीने हिरोची क्रांती झिरोकडे वाटचाल करीत राहते. म्हणून हिरोगामीक्रांती ही फसणारी असते. परंतु सामुहिक परिवर्तन मात्र याला अपवाद असते. जेव्हा वर्गच्या वर्ग जागा होतो तेव्हा तो प्रस्थापित व्यवस्थेविरूद्ध आक्रमक होतो. विशमता मूल्यांचा पाडाव होऊन बहुसंख्य समाज समता मूल्यांना स्वीकारतो, अंगीकारतो तेव्हा सत्ता-व्यवस्थाधारी जमात हादरते. कारण हा जागृत समूह-वर्ग जेव्हा विशमतावादी व्यवस्थेच्या विरोधात आपली व्यवस्था उभी करण्याचा प्रयत्न करेल तेव्हाच हिरोवर्ती वा हिरो अवलंबी मानसिकता बदलेल. ब्राह्मण हिरोचा वापर करतात आणि प्रसंग पडला तर अशा हिरोला झिरोही करतात. डॉ. आंबेडकरांनी सुद्धा 'हू वेअर दी शूद्रा' या ग्रंथात म्हटले आहे. 'They can make or unmake a hero out of zero and zero from a hero !₹ म्हणून विचार न करता हिरोच्या मागे जाणे आणि तो जर संपूर्ण व्यवस्था परिवर्तनाचा उद्गाता नसेल आणि केवळ आपणच एकमेव नेते आहोत अशी शेखी मारत असेल तर अशा 'इगोइस्ट' हिरोला झिरो करणे आवश्यक आहे. मात्र व्यवस्थेविरूद्ध तो उभा ठाकला तर वामनी व्यवस्था तग धरू शकणार नाही. म्हणून त्या दृश्टीने समाजाच्या रचनेकडे वाटचाल करणेच श्रेयस्कर राहील. पैशाच्या आमिशातून, अच्छे दिनच्या आश्वासनातून जर एखादा पक्ष सत्तासीन होत असेल तर हा प्रकार प्रलोभनाने सत्ता स्थापन करण्याचा आहे. याला लोकशाही म्हणता येईल का? आज लोक दारू, मटन, पैसे मिळाल्यास मत देत असतील तर ती लोकशाही नसून पैसेशाही आहे आणि सत्ताधारी तेवढा खर्च करण्यास सक्षम आहेत. मनूची व्यवस्था वा मनूचे राज्य हे निवडणुकीतून जाईल किंवा क्रांती होईल हा भ्रम आहे. जिथे जिथे निवडणुकांच्या माध्यमातून कम्युनिस्ट वा काँग्रेसी राजवट होती, तिथे मनूची सत्ता आली ती EVM नसतांना देखील. म्हणून निवडणुकीतून EVM शिवाय जी सत्ता येते वा आजवर आली ती कितपत मनुव्यवस्थाविरोधी होती? आणि आज ती तशी होईल? म्हणून निवडणुका कितीही सरळ केल्या, निश्पक्ष केल्या तरी मनुव्यवस्था वा सत्ता पराभूत होणार नाही. त्यासाठी लोकमानसिकता मनुग्रस्त झालेली आहे ती उलटी करावी लागेल. ती मन-प्रतिक्रांती खऱ्या समतावादी क्रांतीत परिवर्तीत करावी लागेल. केवळ निवडणुकीवर भरवसा ठेवणे म्हणजे मनुव्यवस्थेला एक प्रकारे जिवंत ठेवणे होय.●●




# बने चाहे दुश्मन जमाना हमारा, सलामत रहे दोस्ताना हमारा...

एका जंगलात एका मोठ्या झाडावर दोन पक्षी चिवचिवाट करीत होते. ते पाहून एक पहिलवान झाडाजवळून जातो व चिवचिवाट ऐकतो. व मनाशी ठरवतो हा पक्षी दंड बैठका कसरत म्हणत आहे असे तिथून जात असलेल्या शेतकऱ्यांला सांगतो. शेतकरी ऐकतो व म्हणतो की पक्षी भाजी मुळा अदरक असे म्हणतात, व दोघेही वाद करतात. तेवढ्यात थोडासा दारू पिऊन एक व्यक्ती येतो तोही पक्षाचे ऐकून दारू चकणा खटखट,असे म्हणून तिघेही वाद करतात, तेवढ्यात पत्नीपासून नाराज झालेला झाडाजवळ,येतो व पक्षाचा चिविवाट ऐकतो व तिघांना म्हणतो की हे पक्षी, पत्नी करते झटपट असे म्हणून चौघेही वाद करतात. तेवढ्यात आश्रमशाळेचा हुशार शिक्षक येतो. व त्या चौघांना सांगतो बंधूनो मी मागील 30वर्षापासून जंगलातील आश्रमशाळेत नोकरी करतो पक्षाच्या बोलीभाषा, प्राण्यांच्या बोलीभाषा मी जाणतो. पक्षाचे चिवचिवाट ऐकतो एक लहानसा दगड भिरकावून पक्षाला हाकलतो. व त्यांना सांगतो की हे पक्षी नेहमी मिळून राहा आपसात, मिळून राहा आपसात असे नेहमी म्हणत असतात.चला आता वाद सोडा माझेकडे चहा नाश्ता करायला चला.सर्व त्या शिक्षकाचा सन्मान ठेऊन आभार व्यक्त करून मिळून मिसळून चहा नाश्ता करायला जातात. बोध.. ...१)प्रत्येक व्यक्ती त्याचेवर झालेल्या संस्कारानुसार विचार करतो.२)ते काही प्रमाणात बरोबरही असते.३)तरीही वादाचे विषय भिरकावून प्रेमाने एकमेकांच्या विचारांचा आदर ठेऊन सर्वसमावेशक मानवतावादी विचारसरणी ठेवलेली बरी असू शकते.४) मैत्रिने वागल्याने व बंधुत्व वाढविल्याने आपसामध्ये एकी निर्माण होऊ शकते.५) आपण सर्व व्यक्ती एकमेकांप्रती परस्परांमध्ये मैत्री वाढवूया.●●

मंगलवाटा



सम्राट माटे (मंगलदर्शी)
मो.9075113644

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### आजचा संपादकीय लेख अत्यंत माहितीपूर्ण आहे.....

उपवर्गीकरणात आणि जनगणनेत भावनेपेक्षा वास्तवाचा विचार करण्याची बहुजन सौरभ ची भूमिका दिशादर्शक ठरली आहे. संपादकाने आजपर्यंत वरील विषयावर दोन्ही मतप्रवाह असलेल्या लेखकांचे विचार, लेख प्रकाशित केले. परंतु स्वतः ची भूमिका सुद्धा स्पष्ट केली. उपवर्गीकरणाचा प्रश्न केवळ आरक्षणाचा नसून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा आहे. जनगणनेत मतमतांतर असले तरी भावनिक न बनता बी प्लॅन चा विचार योग्य पद्धतीने समजाऊन सांगितला आहे. संपादक प्रा. संध्या मॅडम चे खूप अभिनंदन आजच्या दैनिकात अनिल वैद्य सरां च्या 'बौद्धांची जनगणना' या लेखातून अनेकांचे गैरसमज दूर होण्यास मददगार ठरले आहे. ॲड सुभाष सावंगीकर यांचा लेख आजच्या लोकशाहीचे चित्र दर्शवित आहे. सर्वांचे खूप खूप अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा.

श्रीराम बनसोड

08 June 2026 page 03-1_Layout 1 6/7/2026 3:24 PM Page 1



**विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते शासन कर्ती जमात बना. त्यासाठी कामगार,कर्मचारी अधिकारी यांनी संघटित होऊन प्रशासकीय शासन यंत्रणेवर कायम स्वरूपी दबाव ठेवा. आज आपण पाहतो आपल्याला दिलेले लोकशाहीचे जे चार स्तंभ आहेत ते सारेच महत्वाचे आणि निकोप असायला पाहिजेत होते.**

# बौद्धांच्या परिवर्तनवादी विचारांचे लोक व लोकांच्या चळवळी यशस्वी का होत नाहीत?



विशेषतः संसदीय व्यवस्था अत्यंत महत्त्वाची असल्याने आज प्रस्थापित वर्गांनी संसदीय व्यवस्थेवर मजबूत पकड मिळवून प्रशासकीय व्यवस्था, न्याय पालिका व प्रसार माध्यमे आपल्या ताब्यात ठेवल्याचे आपण पाहत आहोत, अनुभवत आहोत. आपले म्हणणारे कर्मचारी अधिकारी प्रशासकीय उच्च पदावरील सचिव त्यांच्या संघटनेचे वार्षिक सभासद व आर्थिक देणगीदार आहेत. हे आमचे आंबेडकरी विचारवंत विसरतात. त्यावर ते बोलत नाही. यातील बरेचसे सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी आता सरकारच्या ध्येय धोरणा विरोधात संघटीत होत आहेत. त्याला साथ देणाऱ्या विचारवंताचे एक पेव फुटले आहे. ते महापुरुषांचे अनेक दाखले देऊन प्रत्यक्षात आपण काय केले पाहिजे होते.आणि आपण काय करत आहोत याचा मात्र बिल्कुल ही विचार करत नाहीत. त्यासाठी मग ते कधी छत्रपती शिवाजी महाराज असे म्हणाले... तर महात्मा फुल्यांनी हे लिहून ठेवले आहे, छत्रपती शाहू महाराजांनी काय काय केले... याचा पाढा वाचुन दाखवतात.तर काही विचारवंत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गांधीवादी विचाराचा सज्जन असो की मनुवादी विचाराचा दुर्जन असो तो बाबासाहेबांचे नाव घ्यायला थकत नाही.त्यामुळे सध्या प्रत्यक्षात काम ठप्प आहे. आणि व्हाट्सअप वर मोबाइल ह्यांग होई पर्यंत तत्वज्ञान पाजळत आहेत. पण चार लोक बसून आपल्याला प्रत्यक्षात काय करायला पाहिजे होते. याची नियोजन बद्ध आखणी करतांना दिसत नाही. शॉटकट नेता बनण्यासाठी सर्व धावपळ दिसते.मग कोणी तरी महापुरुषांना आपल्या भाषणातुन डिवचले की शांत पाण्यात दगड मारून पाणी गढूळ करून सोडतात. मग समाजात गढूळ पाण्याची चर्चा सुरु होते. टोपभर वरणात एक दोन ओंजळ भरून मीठ टाकल्यावर ते कोणाच्या खाण्याचे राहत नाही. अशीच परिस्थिती आज अ.ब.क.ड उपवर्गीकरणाने झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकरांचा जय जय कार करणारे खूप झाले. पण त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे.ते देणारी शिक्षण संस्था काढून, विध्यार्थ्यांसाठी वसतिगृह काढणारे आज पर्यंतच्या चाळीस पंचेचाळीस वर्षाच्या अनुभवातुन खरे फुले, शाहू आंबेडकर यांचे खरे अनुयायी दोनच होऊन गेले. एक कर्मवीर भाऊराव पाटील व दुसरे संत गाडगेबाबा त्यांनी मुले शिकवण्याचे काम हाती घेतले. शिक्षण संस्था काढली, वसतिगृह काढले. त्यात जी मुले शिकली.त्यात ही दोन प्रकार निर्माण झाले. एक वांझोटे तत्वज्ञान पाजळणारे व दुसरे शिकुन सवरुन धर्मांध व्यवस्थेच्या वळचणीत आंघोळ करणारे. मराठा व धनगर आरक्षण हे मुळ विमुक्त भटक्या जाती जमाती, कमकुवत ओबीसी व आदिवासी समाज्या करीता फार मोठे षडयंत्र होते. त्याचा हेतु हा की हा वर्ग सक्षम होण्या ऐवजी जितका विकलांग राहील तेवढेच त्यांना सोईचा होईल. मग अश्या वर्गाला सहजपणे विकत घेता येते. गंभीर बाब म्हणजे एससी मधील अनेक तत्वज्ञानी लोकांनी मराठा आरक्षणाला पाठबळ दिले. एक बौद्ध समाजातील व्यक्तींने मराठा व कुणबी एकच आहेत व धनगड म्हणजे धनगर असे बोलुन बाजुला झाला पण आज त्याचे दुष्परिणाम उर्वरित समाज भोगत आहे. आज अनुसूचित जाती मधील उप वर्गीकरण प्रश्नांवर कोणता मराठा बोलतो आहे?. आम्ही फक्त अति शहाणे असल्यागत वाट्टेल ते बोलतो स्टेज आणी माईक दिला की बोंबट सुटतो. समोर किती ही माणस असो, चार माणसे पुढे दिसली तरी हे आंबेडकरी विचारवंत बैल उकळल्यावर कसा ऐकत नाही अगदी तसेच बोलत सुटतात. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की बौद्धांचे अधिकार माझ्या कोटाच्या खिशात आहेत. खेदाची बाब ही आहे की बुद्ध धम्मा ची दीक्षा घेऊन ७० वर्ष (१९५६ ते २०२६ ) झालीत तरी ही बौद्धांचे अधिकार त्यांच्या कोटाच्या खिशात जशाच्या तसे पडून आहेत. कारण भारतीय बौद्ध महासभा माणूस घडविणारा कारखाना म्हणून ओळखल्या जात होती. ती बुद्धाचा जीवन जगण्याचा मार्ग सांगणारे तत्वज्ञान सांगून माणूस घडविण्याचे काम करत असतांना. ती जगण्याचे अधिकार कसे हस्तगत करावे हे शिकवत असतांना ती आता बौद्ध धम्मा त महार जात लिहण्याचे सांगते. म्हणजे बौद्धांच्या अधिकारांचे काय? हा प्रश्न आपण विचारू शकतो की नाही. ही एक मोठी समस्या झाली आहे. विशेष करून बुद्धिस्ट म्हणून जर समाजात चालविले जाणारे बुद्धिस्ट संस्कार, बुद्धिस्ट विवाह पद्धती, बौद्धांचार्य, धम्माचारी, तथा भिख्खू संघ त्यांची प्रचार प्रसार यंत्रणा त्यांची बुद्ध विहार कमेटीची मालकी हक्क असे कित्येक मुद्दे घेऊन चालणारे जगणारे दीड कोटीहून असणारे लोक एकट्या महाराष्ट्रात आहेत. बुद्धधम्माचे संवग अभ्यासक ,हितचिंतक विपस्सी साधक अशा विविध पातळ्या वर कार्य करणारे निष्ठावंत धम्म उपासक, दायक बौद्धांच्या अधिकारावर बोलत नाही. पण महार लिहल्याने बनल्याने काय फायदा होणार हे सांगणारे बौद्धांच्या अधिकारावर कधी बोलतील?. म्हणूनच आंबेडकरी विचारवंत म्हणजे बैल उकळल्यावर कसा ऐकत नाही अगदी तसेच करतात. बौद्धांच्या परिवर्तनवादी विचारांचे लोक व लोकांच्या चळवळी यशस्वी का होत नाहीत?.कारण फक्त चर्चा करतील, कृतीमध्ये शून्य..!.जे लोक पुढाकार घेऊन काही करत असतील,तर काही लोक फक्त बघ्याची भूमिका घेतील. स्वतःहून पुढाकार घेणार नाहीत आणि पुढाकार जो घेतोय,त्याला मदत ही करणार नाही.चळवळीतील उपक्रमात लोकांची संख्या वाढावी, उपक्रम यशस्वी व्हावे, यासाठी मी काहीतरी केले पाहिजे? असा विचारच करत नाही.



सागर रामभाऊ तायडे
9920403859

सोशल मिडियाचा चळवळीच्या प्रचार प्रसारासाठी योग्य वापर न करता रिकामटेकड्या आणि बिनकामाच्या पोस्ट करत बसतात. आपल्या कुटुंबातील लोकांना अजिबात चळवळीतील उपक्रमात सहभागी करून घेत नाहीत. फक्त कार्यक्रमांना उपस्थित राहायचे, एवढेच कर्तव्य काही लोक समजतात. चळवळीला जीवंत ठेवण्यासाठी वेळ, बुद्धी आणि पैसा देणारे लोक अपेक्षित आहेत, पण अगदी बोटावर मोजता येतील एवढेच लोक हे जर करत असतील, तर चळवळ कशी उभी राहिल आणि पुढे जाईल..? हा आपणच विचार करा! आणि संवाद कराल ही अपेक्षा. ●●

## काय लिहू?

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

कधीकधी खुप लिहावे वाटते पण नेमके काय लिहावे हे सुचत नाही. कधी वाटते जे होऊन गेले त्याची सत्यता लिहू की, आपण बघत असलेल्या स्वप्नांची सावली लिहू? मनात विचार येतो जे जिवन आपण आजवर जगलो त्या क्षणांची जुळवाजुळव करून स्वतःचीच एखादी कहाणी लिहावी. जे कार्य आजवर आपण पुर्ण करू शकलो नाही त्याचा ऊल्लेख करावा की, जे मनातले भाव आपण आजवर मनमोकळेपणाने व्यक्त करू शकलो नाही त्याला वाट मोकळी करून देऊन मोकळे व्हावे. आजवर आपण का मौन होतो. मनात काय काय साठवून ठेवले आहे. कोणत्या ईच्छा, आकांक्षा दडलेल्या आहेत वाटते की त्यांच्यावरील पडदा हटवून टाकावा. काळाने टाकलेले डाव, आपल्याच माणसांनी फिरवलेली पाठ, स्वतःचीच स्वतःशी चाललेली लढाई. जे कमावले, जे गमावले त्याची बेरीज वजाबाकी, काय सुटले, काय जुळले, काय ऊरलें अशा कितीतरी विषयांवर लिहावे वाटते पण पुन्हा तेच नेमके काय लिहावे हेच सुचत नाही. कधीकधी निराश होतो. मग लिहायचा विचार सोडून देऊन आपण प्रत्यक्षात काय करू शकतो? आपली क्षमता किती? आता काय करायला हवे म्हणजे भविष्यात आपण आपल्याच आयुष्या बद्दल लिहू शकु असा विचार मनात डोकावतो. मग आपले मन आपल्याला समजावते.

**‘अंधेरे की शिकायत छोड़कर, उम्मीदों का दीप जलाना सीखों, राहें खुद रोशन हो जाएगी,**
**खुदपर भरोसा जताना सीखो, परिस्थितियाँ बदलती रहती है, हर हाल में मुस्कुराना सीखो,**
**मंजिल भी हासिल हो जाएगी, वक्त के साथ कदम मिलाना सिखो. ●●**

# प्रबोधनातून समाज परिवर्तन

**खरे पाहिले तर भारतीय समाजात खूप लोक प्रबोधन करणारे आहेत. त्यात गाणे गाणारे असतील, या कथा वाचक असतील, या सुगम संगीत वाले असेल, या कव्वाली गाणारे असेल या नाटककार असेल, या कवी असतील या भाषण देणारे सामाजिक, राजकीय, धार्मिक कार्यकर्ते असतील.**




या अन्य कोणी असतील. आप आपल्या पद्धतीने ही सारी लोक समाजाचे प्रबोधन करीत असतात. ज्याचे कडे जेवढी बुद्धी मत्ता असेल, जी, ती ज्या, ज्या विचार धारेची लोक असतील ती, ती विचार धारा लोकांपर्यंत प्रबोधनाच्या माध्यमातून पोहचविण्याचा प्रयत्न करतात. ऐकणारे लाखो, करोडो लोक आहेत. ज्या लोकांची शैली ही लोकांना आकृष्ट करून, त्याच्या हृदयापर्यंत शब्द पोहचविणारी असते लोक तिकडे झुकताना आपल्याला जाणवते. अनेक लोक भाषणे देतात, कोणी काल्पनिक गोष्टी सांगून त्याना अंधश्रद्धेकडे घेऊन जाते,तर काही वैज्ञानिक दृष्टीकोण सांगून ते कसे कल्पोकल्पीत लोकांना सांगून फसवितात हे सांगितल्या जाते. या प्रबोधन करणाऱ्याच्या मधात ऐकणारा आणि त्या मार्गाने जाणारा मोठा वर्ग आहे तो अशिक्षितही आहे तर काही शिकलेला देखील आहे. खर्र्र्र्र्र्र्र्र तर शिकलेल्या माणसाला वैज्ञानिक दृष्टीकोण समजला पाहिजे पण काहीना पूर्वी पासूनच कानावर काल्पनिक कथा ऐकायला येत असल्यामुळे त्याच्यात बदल होण्यासाठी खूप कालावधी लागतो. जसा मुलगा, मुलगी जन्म झाल्यानंतर त्याला अठरा वर्षानंतर मतदानाचा अधिकार संविधानाने दिला आहे,म्हणजे त्याला स्वतःचे मत कुठे दिले पाहिजे याची जाणीव होते असे म्हणायला हरकत नाही त्याच शिक्षण देखील काही प्रमाणात झालेले असते त्यामुळे तो योग्य अयोग्य निर्णय घेण्यासाठी सक्षम असतो. असे असतांना देखील अशोक खरात सारखे भोंदू बाबा हे शिकलेल्या माणसाला आपल्या जाड्यात अडकवितात याला काय म्हणता येईल? भारतात अंधश्रद्धा निर्मूलन चा कायदा आहे असे असतांना देखील हा अशोक खरात आपले जाळे पसरवितो याला नेमके कारण काय असेल हा संशोधनाचा आणि चर्चेचा विषय झाला आहे.अलीकडे तो अठरा मार्च पासून जेल मध्ये, वेगवेगळ्या गुन्ह्यात लटकलेला आपल्याला दिसतो. लोकांची फसवणूक करणे हे काहींना सहज जमते, पण तो लोकांची फसवणूक करत आहे हे सांगणे आणि लोकांच्या डोक्यात प्रबोधन करून टाकणे जरा कठीण असते, कारण प्रबोधन करण्यासाठी त्याला उपलब्ध स्टेज हवा असतो. ज्ञान आहे, त्याला सांगताही येते, लोकही कार्यक्रमासाठी येतील पण त्याचे नियोजन करणे, स्टेज उपलब्ध करून देणे, प्रचार, प्रसार करण्यासाठी पैशाची जुळवा, जुळव करणे, वेळ प्रसंगी भोंदू बाबाच्या कार्यकर्त्यासोबत संघर्ष करणे, प्रशासनाला समजावून सांगणे, हे सारे करत असतांना खूप तारेवरची कसरत करावी लागते म्हणजे वेळ, पैसा, श्रम हे सारे त्याला दयावे लागते आणि ते एकट्याचे काम नसल्याने खूप त्रास होतो आणि बऱ्याचदा त्यावर कुटुंबातील लोकांची जबाबदारी असल्यामुळे लोक फारसे पुढे येतांना दिसत नाही त्यामुळे भोंदूगिरी चा बाबा लोकांचा व्यवसाय चालतो ही वास्तविकता आहे. म्हणजे फारसे लोक सार्वजनिक कामा कडे दुर्लक्ष करतात. तसा अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा असल्यामुळे भारतीय समाजाचे प्रबोधन होण्याच्या दृष्टीने प्रशासन आणि शासनाने त्यावर काम करण्याची गरज आहे. तसे पाहिले तर संविधानात मूलभूत कर्तव्या मध्ये आर्टिकल 51 मध्ये वैज्ञानिक दृष्टीकोण जोपासला पाहिजे असे सांगितले आहे. त्यामुळे शासन आणि प्रशासन यांची जबाबदारी जास्त आहे. पण ते मोठया प्रमाणात प्रबोधन करीत नाही काही वैज्ञानिक दृष्टीकोणावर बोलतात यात दुमत नाही पण ते मोठया प्रमाणात व्हायला हवे तरच लोक अंधश्रद्धा मधून बाहेर येतील अन्यथा नाही. भारतीय न्याय संहिता मध्ये हिंसेला प्रतिबंध करण्यात आलेला आहे. अनाचाराला प्रतिबंध करण्यात आलेला आहे. छेड छाड ला अटकाव करण्यात आलेली आहे. फसवणूक करणाऱ्याला प्रतिबंध करण्यात आलेला आहे. त्याच बरोबर नशा पाणी घेऊन धुमाकूळ करणाऱ्या साठी प्रतिबंध करण्यात आलेला आहे. म्हणजे हे सर्व पूर्वीच्या भारतीय दंड संहिता म्हणजे (आय पी सी ) मध्ये होते. अलीकडे त्याला भारतीय न्याय संहिता (बी एन एस ) मध्ये दिल्या गेलेले आहे. हे अनेकांना माहित आहे. जर प्रबोधनकरानी, आणि प्रशासन, शासनातील लोकांनी या संदर्भात लोकांना योग्य प्रबोधन केले तर देशात होत असलेला कल्लोळ सहज कमी होईल.म्हणजे च प्रबोधनातून समाज परिवर्तन होईल. खरं तर समाज सुखी व्हावा, चांगला घडावा हेच प्रशासन, शासनाचे आदय कर्तव्य आहे. आणि सामाजिक कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे. आपण ती जबाबदारी कोणत्या अंगाने खांद्यावर घेतो, आणि लोकांचे प्रबोधन करतो त्यावर लोकांचे हित, अहित अवलंबून आहे. जर लोकांनी खऱ्या अर्थाने भारतीय समाजाचे हित लक्षात घेता वाटचाल केली तर देश हा प्रगतीच्या दिशेने जाईल आणि सर्व भारतीय बांधव सुखी होईल. ही जबाबदारी आपण आपले मूलभूत कर्तव्य म्हणून पार पाडली पाहिजे. म्हणजेच ‘प्रबोधनातून समाज परिवर्तन’ होय. ते आपल्या हातून व्हावे असेच भारतीय नागरिकांना वाटते. ●●



अविनाश टिपले
मो.9970917389

# विरगळ



**शिलाहार काळापासून साधारनपणे सतराव्या शतकापर्यंत विरगळ बनविण्याची प्रथा चालु होती. विरगळ हि स्मृती शिळा आहे. युध्दात गोधनाचे रक्षण करताना एखाद्या पवित्र कार्यासाठी बलिदान करताना जर एखाद्या ला वीरमरण आले तर त्याच्या स्मृतीप्रितर्थ विरगळ उभारला जात असे.**

त्या पासुन पुढच्या पिढीलाही आपल्या धर्मसाठी राज्यासाठी लढण्याची बलिदान करण्याची प्रेरणा मिळत असे. विरगळ हा आयताकृती दगडावर कोरलेला असतो. या दगडावर 1 2 3 किंवा 4 चित्र (शिल्प) कोरलेल्या असतात. सर्वता खलच्या चौकटीत ज्या कारणामुळे योध्दयाला वीरमरण आलेते शिल्पाकिंत केलेले असते. यात वीर युद्ध करताना गोधनाचे रक्षण करतान हिंस्त्र प्राण्याशी लढताना शिकार करताना दा ख वि ले ला असतो. दुसऱ्या चौकटीत अप्सरा बरोबर दाखविलेला असतो याचा अर्थ उप्सरा त्याला स्वर्गात घेऊन जात आहेत. तो स्वर्ग सुख उपभोगत आहे असा होतो. त्याच्या पुढील चौकटीत ब्राम्हण / साधु पुजा सांगत आहे किंवा वीर एकटा पत्नी सोबत शंकराच्या पींडीची पुजा करताना पहावयास मिळतो. याचा अर्थ त्याने केलेल्या पुण्य कर्मा मुळे तो देवाशी एकरूप झालेला आहे त्याला मोक्ष मिळालेला आहे. या चौकटीच्या वर पिंड मंगल कलश आणी त्याच्या एकाबाजुला चंद्र आणि दुसऱ्या बाजुला सुर्य कोरलेला असतो. याचा अर्थ सूर्य व चंद्र असे पर्यंत या वीराची किर्ती असमंतात रा ही ल . पण सत्य परिस्थिती आहे की विरगळावर फार कमी प्रमाणात शिलालेख आहेत. त्यामुळे विरगळ पाहुन त्यातील वीर कोण आहे? कुटल्या युद्धात तो कामी आला व वीरगळाचा निर्माता कोण आहे? हे सागता येत नाही. वीर कोणत्या धर्माचा हिंदु जैन बौध्द कोणत्या पंथाचा असेल त्याप्रमाणे शिल्पांकन बदलत जाते. वीराच्या हुद्याप्रमाणे ऐपतीप्रमाणे त्यांचे वंशज जास्त खर्च करून वीरगळ तयार करत असणार मालाडे पो रामराज ता आलिबाग येथे वीरगळ सापडली असुन वर मंगळकलश व सुर्य चंद्र तसेच शंकराची पिंड असुन मोक्ष मिळण्यासाठी देवाला आराधना केली जाते. गोरक्षणासाठी युद्ध केले होते. जवळच पार्थनाथाची मुर्ती सापडली आहे. ●●

संतोष बाबु शिंदे
मो. 9860218733

**मानवी समाजाच्या इतिहासात जेव्हा जेव्हा विद्यमान व्यवस्था लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरली, तेव्हा तेव्हा नव्या विचारांचे, नव्या चळवळींचे आणि नव्या राजकीय प्रयोगांचे उदय झाले. आजच्या भारतातही अशीच एक अस्वस्थता अनेक स्तरांवर अनुभवायला मिळते.**

# अस्वस्थ वर्तमानात उदयास आलेल्या कॉकरोच जनता पार्टीचा उदय आपल्याला काय सांगून जातो?




बेरोजगारी, महागाई, वाढती आर्थिक विषमता, सामाजिक तणाव, भ्रष्टाचार, लोकशाही संस्थांवरील प्रश्नचिन्हे आणि राजकीय पक्षांबद्दलचा वाढता अविश्वास या पार्श्वभूमीवर विविध पर्यायी राजकीय आणि सामाजिक प्रवाह पुढे येताना दिसतात. अशा परिस्थितीत उदयास आलेली ‘कॉकरोच जनता पार्टी’ ही संकल्पना केवळ एका संघटनेची किंवा सोशल मीडिया मोहिमेची बाब नसून ती वर्तमान समाजमनातील असंतोष, उपरोध आणि परिवर्तनाच्या आकांक्षेची अभिव्यक्ती म्हणून पाहता येते. कॉकरोच हा शब्द सामान्यतः प्रतिकूल परिस्थितीतही जिवंत राहणाऱ्या जीवासाठी वापरला जातो. त्यामुळे या नावामागे प्रतीकात्मक अर्थ दडलेला दिसतो. व्यवस्थेने कितीही दुर्लक्ष केले, संकटे कितीही वाढली, तरी सामान्य जनता संघर्ष करत राहते, जगत राहते आणि आपला आवाज उठवत राहते. या दृष्टीने पाहता कॉकरोच जनता पार्टीचा उदय हा समकालीन भारतातील सामाजिक आणि राजकीय वास्तव समजून घेण्यासाठी महत्त्वाचा विषय ठरतो. कोणतीही नवीन चळवळ किंवा राजकीय प्रयोग शून्यातून निर्माण होत नाही. त्यामागे समाजातील काही ठोस परिस्थिती आणि अनुभव असतात. आज अनेक युवक शिक्षण पूर्ण करूनही बेरोजगारीचा सामना करत आहेत. ग्रामीण भागात शेती संकटात आहे. शहरी भागात वाढत्या जीवनखर्चामुळे सामान्य नागरिक त्रस्त आहेत. रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि निवारा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर पुरेशी प्रगती होत नसल्याची भावना अनेकांच्या मनात निर्माण झाली आहे.

याशिवाय राजकीय पक्ष निवडणुकांच्या काळात मोठमोठी आश्वासने देतात; परंतु निवडणुकांनंतर अनेक प्रश्न प्रलंबितच राहतात. त्यामुळे लोकांमध्ये निराशा आणि संताप वाढतो. या संतापाला अभिव्यक्ती देण्यासाठी अनेकदा नवीन राजकीय विचारपीठे किंवा आंदोलनात्मक संघटना पुढे येतात. कॉकरोच जनता पार्टीचा उदयही अशाच असंतोषातून झालेला प्रयत्न म्हणून समजता येतो.

एकविसाव्या शतकातील सर्वात मोठा बदल म्हणजे डिजिटल क्रांती. पूर्वी एखादी राजकीय चळवळ उभारण्यासाठी मोठे आर्थिक पाठबळ, प्रसारमाध्यमांचा आधार आणि विस्तृत संघटनात्मक जाळे आवश्यक असे. आज सोशल मीडिया या सर्व गोष्टींना पर्याय म्हणून उभा राहिला आहे. फेसबुक, यूट्यूब, एक्स, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲप यांसारख्या माध्यमांमुळे सामान्य व्यक्तीलाही आपले विचार लाखो लोकांपर्यंत पोहोचवणे शक्य झाले आहे. त्यामुळे मुख्य प्रवाहातील राजकारणाला पर्याय म्हणून अनेक नवीन विचारधारा, गट आणि संघटना उदयास येऊ लागल्या आहेत.

कॉकरोच जनता पार्टीचा प्रसारही मोठ्या प्रमाणात सोशल मीडियाच्या माध्यमातून झाल्याचे दिसून येते. यामुळे आधुनिक राजकारणात डिजिटल माध्यमांची ताकद किती वाढली आहे हे स्पष्ट होते. आजच्या काळात लोक अनेकदा थेट राजकीय भाषेपेक्षा उपरोध, व्यंग आणि प्रतीकात्मक अभिव्यक्तीचा वापर करताना दिसतात. 'कॉकरोच जनता पार्टी' हे नावच मुळात एक प्रकारचा उपरोध व्यक्त करते. समाजातील सर्वसामान्य लोकांच्या परिस्थितीचे प्रतीक म्हणून कॉकरोच ही प्रतिमा वापरली गेली असावी. जेव्हा नागरिकांना असे वाटते की सत्ताधारी वर्ग त्यांच्या समस्या समजून घेत नाही, तेव्हा ते आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी उपरोधिक भाषेचा वापर करतात. इतिहासातही व्यंगचित्रे, कविता, लोकगीते आणि नाटके यांच्या माध्यमातून सत्तेवर टीका करण्यात आली आहे. कॉकरोच जनता पार्टी हा त्याच परंपरेचा आधुनिक अविष्कार मानता येईल.

अमेरिकेतील बोस्टन युनिव्हर्सिटी मध्ये शिक्षण घेणारे अभिजीत दिपके हे असेच एक सोशल मीडिया द्वारे 'कॉकरोच जनता पार्टी' नावाचे नॉन पॉलिटिकल मुवमेंट चालविणारे तरीही देशातील करोडो तरूण मूलांचे ऑयकान म्हणून आपल्या देशाच्या पटलावर उमटलेले एक तरूण क्रांतिकारी योध्दा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बायोग्राफी असलेले पुस्तक उंचावत या मुलाने दिल्ली एअरपोर्ट वर एन्ट्री केली. तरूणांच्या हातात डॉ. बाबासाहेब असतील तर निश्चितच लढण्याची ताकद त्यांच्यामध्ये निर्माण होते कारण या देशात सोशित, पिडित, दुर्लक्षित लोकांना जर स्वाभिमान कोण शिकवित असतील तर ते म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर. विद्यमान सरकारचा इतिहास बघता भिती होती या तरूणाला की आपण गिरफ्तार केले जाऊ. म्हणून तो जंतरमंतर वरील भाषणात म्हणाला, ‘की माझ्या आईला माझ्या बहिणीला भीती होती की मला गिरफ्तार केले जाईल.. अशी भीतीदायक परिस्थिती आपल्या देशात का निर्माण झाली आहे?’ कॉकरोच पार्टीचे पहिले उद्दिष्ट होते की केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेणे. पण प्रस्थापित सरकार हे मुके, बहिरे आणि आंधळे ही झालेले आहे त्यामुळे ते सहजासहजी लोकांच्या जनभावनेला मुळीच भीक घालणार नाही.

या आंदोलनात महत्वाचे म्हणजे सोशल ॲक्टिविस्ट सोनम वांगचूक हे सुध्दा सहभागी झाले होते. ‘हातात गुलाबाचे फुल घेऊन इथल्या पोलिसांना सुध्दा द्या.. कारण सरकारच्या गैरजिम्मेदारीपूर्ण कृत्याची शिकार पोलीसांची मुले सुध्दा झाली आहेत’ असेही ते म्हणाले.

हे आंदोलन सकाळी दहा वाजता सुरू झाले आणि दुपारी तीन पर्यंत सुरू होते. देशाच्या कानाकोपऱ्यातून अनेक मुले या आंदोलनात सहभागी झाली होती. काकरोच जनता पार्टीने पाच दिवसांचा अल्टिमेट सरकारला दिला. पुढील शनिवार पर्यत शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा झाला नाही तर परत जंतरमंतर वर तसेच देशात ठीकठिकाणी आंदोलने सुरू होईल असा इशारा ही या पार्टीने दिला. त्यामुळे पुढेपुढे सरकार आणि काकरोच जनता पार्टी यांच्यामधे मांजर - उंदराचा खेळ कसा सुरू राहील? युवकांच्या भावनांचा, मुलांच्या भविष्याचा हे सरकार विचार करेल की सत्तेच्या नशेमध्ये चूर राहून देशामध्ये असंतोष वाढविण्यास कारणीभूत ठरेल हे ही बघणे महत्वपूर्ण ठरेल. लोकशाहीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पर्याय निर्माण होण्याची क्षमता. लोकांना विद्यमान पक्षांबद्दल असमाधान वाटू लागल्यास ते नवीन पर्याय शोधू लागतात. त्यामुळे नवीन पक्ष किंवा चळवळी उदयास येणे ही लोकशाहीच्या आरोग्याची खूण मानली जाते. कॉकरोच जनता पार्टीचा उदय आपल्याला हे सांगतो की समाजातील काही घटकांना विद्यमान राजकीय पर्याय अपुरे वाटत आहेत. ते आपल्या प्रश्नांसाठी नवीन व्यासपीठ शोधत आहेत. ही प्रक्रिया लोकशाहीला अधिक व्यापक आणि सशक्त बनवणारी ठरू शकते.

आज भारतातील लोकसंख्येचा मोठा भाग युवा आहे. या तरुण पिढीच्या अपेक्षा, आकांक्षा आणि प्रश्न पूर्वीच्या पिढ्यांपेक्षा वेगळे आहेत. त्यांना रोजगार, गुणवत्तापूर्ण शिक्षण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि पारदर्शक शासन हवे आहे.

जेव्हा युवकांना त्यांच्या प्रश्नांवर पुरेसे उत्तर मिळत नाही, तेव्हा ते नवीन चळवळींकडे आकर्षित होतात. काकरोच जनता पार्टीच्या चर्चेमध्येही युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. याचा अर्थ असा की आजची तरुणाई राजकारणापासून दूर नसून ती नव्या स्वरूपात राजकीय सहभाग नोंदवत आहे.

कॉकरोच जनता पार्टीचा उदय हा व्यवस्थेविरोधातील एका प्रकारच्या संतापाचे प्रतीक आहे. हा संताप फक्त सरकारविरोधी नसून संपूर्ण राजकीय, सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेविषयी असू शकतो.

जेव्हा नागरिकांना असे वाटते की त्यांच्या समस्यांकडे कोणीही गांभीर्याने पाहत नाही, तेव्हा ते विद्रोहात्मक भूमिका घेतात. अशा वेळी नवीन प्रतीके, नवीन घोषणा आणि नवीन संघटना निर्माण होतात. हा विद्रोह सकारात्मक परिवर्तनासाठी वापरला गेला तर समाजाला नवीन दिशा मिळू शकते. कोणत्याही नव्या राजकीय किंवा सामाजिक चळवळीचे मूल्यांकन करताना तिचा सामाजिक न्यायाशी असलेला संबंध महत्त्वाचा ठरतो. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्थेची कल्पना मांडली. त्यांच्या मते लोकशाही ही केवळ मतदानाची व्यवस्था नसून ती सामाजिक जीवनपद्धती आहे. त्यामुळे कोणतीही नवीन चळवळ जात, धर्म, लिंग किंवा वर्ग यांच्या आधारावर भेदभाव करत असेल तर ती लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांशी सुसंगत ठरत नाही. काकरोच जनता पार्टी किंवा तत्सम चळवळींचे मूल्यमापन करताना त्या सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये, मानवी हक्क आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांना कितपत प्राधान्य देतात हे पाहणे आवश्यक आहे.



सरिता सातारडे
मो. 8308853051

नवीन चळवळींचा उदय महत्त्वाचा असला तरी त्यांच्यासमोर अनेक आव्हाने असतात. सुरुवातीला लोकांचे लक्ष वेधून घेणे सोपे असते; परंतु दीर्घकालीन संघटन उभारणे कठीण असते.

इतिहास सांगतो की अनेक मोठे बदल सुरुवातीला लहान आणि दुर्लक्षित वाटणाऱ्या चळवळींतून घडले आहेत. त्यामुळे कोणत्याही नव्या सामाजिक किंवा राजकीय प्रयोगाकडे केवळ उपहासाने पाहणे योग्य नाही.

तथापि परिवर्तन घडवण्यासाठी केवळ असंतोष पुरेसा नसतो. त्यासाठी विचार, संघटन, नेतृत्व, कार्यक्रम आणि सातत्यपूर्ण जनसंपर्क आवश्यक असतो. जर कॉकरोच जनता पार्टीसारख्या संकल्पना या दिशेने वाटचाल करतील तर त्या समाजातील प्रश्नांवर व्यापक चर्चा घडवून आणू शकतात. अस्वस्थ वर्तमानात उदयास आलेली काकरोच जनता पार्टी आपल्याला अनेक महत्त्वाचे संदेश देऊन जाते. ती समाजातील वाढत्या असंतोषाची अभिव्यक्ती आहे. ती विद्यमान राजकीय व्यवस्थेवरील प्रश्नचिन्ह आहे. ती सोशल मीडियाच्या नव्या राजकारणाचे उदाहरण आहे. ती युवकांच्या अपेक्षा आणि संघर्षांचे प्रतीक आहे. ती लोकशाहीतील पर्यायांच्या शोधाची प्रक्रिया दर्शवते. मात्र कोणत्याही चळवळीचे अंतिम मूल्यांकन तिच्या घोषणांवर नव्हे, तर तिच्या कृतींवर आणि समाजावर होणाऱ्या परिणामांवर अवलंबून असते. जर ती समता, स्वातंत्र्य, बंधुता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक न्याय या मूल्यांना बळकट करत असेल तर ती लोकशाहीसाठी सकारात्मक शक्ती ठरू शकते. अन्यथा ती केवळ असंतोषाची तात्पुरती अभिव्यक्ती बनून राहू शकते. म्हणूनच कॉकरोच जनता पार्टीचा उदय आपल्याला एक मूलभूत प्रश्न विचारण्यास भाग पाडत-आजची लोकशाही सामान्य माणसाच्या आशा, अपेक्षा आणि संघर्षांना कितपत न्याय देत आहे? या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर शोधणे हीच या घटनेची खरी शिकवण आहे.●●

